JBSPM'S,

# ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE,

## SHIVAJINAGAR, GADHI.

GEORAI TQ. GEORAI DIST.BEED 431127

**PART A: GENERAL INFORMATION AND ACADEMIC BACKGROUND.**

ANNUAL SELF- ASSESSMENT FOR THE PERFORMANCE BASED APPRAISAL SYSTEM

1. Name (in Block Letters): MR. RAMESH BABASAHEB RINGNE
2. Department: MARATHI
3. Current Designation & Grade Pay**:** Assistant Professor Level 12
4. Date of last Promotion**:** 23/11/2022
5. Address (With Pin Code): Dept of MARATHI,
   JBSPM'S, ARTS & SCIENCE COLLEGE,
   SHIVAJINAGAR, GADHI.
   TQ. GEORAI DIST. BEED 431127

Telephone No: 8208694037 / 9823720374

Email: rameshringne@gmail.com

Academic Qualifications (SSC to Post Graduation):

| Examinations | Name of the Board/ University | Year of Passing | Percentage of marks obtained | Division/ Class/ Grade | Subjects |
|---|---|---|---|---|---|
| **S.S.C.** | Aurangabad Divisional Board | March 1996 | 61.46 % | Ist | Marathi, Hindi, English, Science, Social Science, Mathematics |
| **H.S.C.** | Aurangabad Divisional Board | March 1998 | 60.00 % | Ist | Marathi, English, History, Pol.Sci., Sociology, Economics |
| **B.A.** | Dr. B. A. M. U. Aurangabad | March 2001 | 55.04% | IInd | Marathi, Pol Sci Sociology |
| **M. A.** | Dr. B. A. M. U. Aurangabad | April 2003 | 58.12 % | IInd | Marathi |
| **NET** | UGC New Delhi | December 2005 | -- | -- | Marathi |
| **MS CIT** | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | April 2010 | 77 | Ist | English |

Research Degree-

| Degrees | Title | Date of award | University |
|---|---|---|---|
| Ph.D | Balkavi Ani N.D. Mahanor Yanchya Kaviteche Samagra Aakalan | Appear | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad. |

| Designation | Department | Date of actual Joining | Period of Working | |
|---|---|---|---|---|
| | | | From | to |
| Assistant Professor | Marathi | 22/12/2010 | 22/12/2010 | Till to date |

Period of teaching experience: (in years)- 12

Research Experience excluding years spent in Ph. D. (In years) – 08

Fields of Specialization under the Subject / Discipline- Modern Literature in Marathi.

Academic Staff College Orientation / Refresher Course/ ISTE - AICTE Sponsored STTP/SBP attended so far.

| Sr.no. | Name of the Course | Place | Duration | Sponsoring Agency |
|---|---|---|---|---|
| **1** | Orientation Program (103rd) | UGC, HRDC Dr,B.A.M.U. A'bad | 02/06/2014 to 28/06/2014 | UGC, New Delhi |
| **2** | Special Winter school programme, Refresher Course | UGC, HRDC Dr,B.A.M.U. A'bad | 01/11/2017 to 22/11/2017 | UGC, New Delhi |
| **3** | Refresher Course in Language & literature | UGC, HRDC Dr,B.A.M.U. A'bad | 17/06/2019 to 29/06/2019 | UGC, New Delhi |
| **4** | Refresher Course in Comparative study in folk literature | UGC, HRDC University of Mumbai | 24/05/2021 to 05/06/2021 | UGC, RUSA, New Delhi |

Books Published as single author or as editor

| Sr.no. | Title | **Types of Book & Authorship** | **Publisher & ISSN/ ISBN No.** | **Whether peer reviewed** | **Authors / Editor** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | चित्कळा | Arts & science college Gadhi | 978-93-81921-10-4 | Peer reviewed | Editor |
| 2 | उत्तम कांबळे व्यक्ती आणि वांगमय | Arts & science college Gadhi | 978-93-81921-35-7 | Peer reviewed | Editor |
| 3 | भारतीय स्वांतत्र्याचा अमृत महोस्तव -संधी आणि आव्हाने | Arts, science & commerce college Gadhi | 978-81-955479-7-5 | Peer reviewed | Co-Editor |

Full Papers in Conference proceedings

| Sr. No. | Title of Paper | Details of conference publication | ISSN/ISBN No. |
|---|---|---|---|
| 01 | Ek Manswi Manus,Wakta Ani Vicharwant | Uttam kambale Vaktyi Ani Wangmay | 978-93-81921-35-7 |
| 01 | Gramin Kadambaricha Vatchalitil Navi Parimane | Sidheshwor Mahavidyalaya Majalgaon | |
| 03 | Mahatma Gandhinchi Gramin Sasrasdhata | Balbhim Mahavidyalaya Beed | |
| 04 | Naya Hakkacha Lada : Dalit Sahitya Chalwal | Power Of Knowledge January 2018 Page No. 369-372 | .2320 4494 |
| 05 | Gramin Sahitya ani Badalte Vastav | | |

Published Papers in Journals

| Sr. No | Title with page Nos. | Journal | ISSN No. | Peer Review. Impact Factor |
|---|---|---|---|---|
| 01 | Sant Eknathache Hindi Bharud | Power Of Knowledge | 2320-4494 | Peer Review |
| 02 | Javed Pasha Yanchi Kavyatma Sangharshilata | Power Of Knowledge | 2320-4494 | Peer Review |
| 03 | Jivan Padhaticha Chntangarabha Avishkar : Bahinabaiche Gane | Power of Knowledge, April –June - 2014 | 2320-4494 | Peer Review |
| 04 | Bhagwat Sampradyachi Pandharpur Anubandhit Parmpara | Power of Knowledge, Jan- March 2015 | 2320-4494 | Peer Review |
| 05 | Kirtan Kal ani Aaj | Power of Knowledge, April - sept 2015 | 2320-4494 | Peer Review |
| 06 | Borkaranchi Kavita | Power of Knowledge, Oct-Dec 2015 | 2320-4494 | Peer Review |
| 07 | Marathi Sahitityatil Gramin Sankalpana | Power of Knowledge Oct-Dec 2015 | 2320-4494 | Peer Review |
| 08 | Marathi Sahitya Ani Chitrapat Sahasabandh | Power of Knowledge Oct-Dec 2017 | 2320-4494 | Peer Review |
| 09 | Loktatwacha Eknishtha dhaga –Mahanoranchi Kavita | AJANTA oct-Dec 2017 page -28-30 | 2277-5730 | 4.205 |
| 10 | Gram vikasacha Tatwdnyan Gramgeeta | Printing Area Dec-2017 Page .116-117 | 2394-5303 | 4.002 |
| 11 | Nisargala Partibimbit Karnari Balkavichi Kavita | Vidyavarta April to June 2018 Page.92-94 | 2319-9318 | 5.131 |
| 12 | Paryawaran ani Marathi Kavita | Research Journey Page No-327-330 | 2348-7143 | 6.261 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | Marathi Bhasha ,Jagatikikaran ani Chitrapat | Printing Area | 2394-5303 | 4.002 |
| 14 | Loktatwacha Eaknishtha Dhaga : Mahanoranchi Kavita. | Ajanta<br>P.no 28-30<br>Oct-Dec. 2017 | 2277-5730 | 4.205 |
| 15 | Gramvikasache Tatwadnyan – Gramgeeta | Printing Area<br>P.no 116-117<br>Dec. 2017 | 2394-5303 | 4.002 |
| 16 | Nirsargala Pratibimbit Karnari – Balakavichi Kavita | Vigyawarta<br>P.no 92-94<br>April to June 2018 | 2319-9318 | 5.131 |
| 17 | Naya Hakkacha Lada : Dalit Sahitya Chalval | Power of Knowledge<br>Special Issue,<br>P. no. 369-372<br>January 2018 | 2320-4494 | |
| 18 | Paryarvan Ani Marathi Kavita | Research Journey<br>P.no 327-330<br>October 2018 | 2348-7143 | 6.261 |
| 19 | Jagtikaran, Marathi Bhasha, Marathi Cinema | Amierj<br>P.no 262-265<br>Jan - Feb. 2019 | 2278-5655 | 4.002 |
| 20 | Boli ani Bhasha marathicha kalantar, sthitantaracha itihas | Ajanta<br>P.no 48-52<br>Jan, to march 2019 | 2277-5730 | 5.5 |
| 21 | Strivadache Sawarup Ani Sankalpana | Power of Knowledge<br>P.no 146 -149<br>July to Sept. 2019 | 2320-4494 | -- |
| 22 | Marathwadyacha Lokdharna pravahi karnari mahanoranchi Kavita | Uorhearitage,volume p. no.1249-1254 Feb.2020 | 0474-9030 | 6.8 |
| 23 | Bahinabaicha Kavitetil Krushi Anubhuti | Power of Knowledge<br>P.no 101-103<br>April to Jun. 2020 | 2320-4494 | -- |
| 24 | Sagharshshil Vicharachi KratishilNandi mahanje Amhiladhalo Amhi Ghadlo.<br>. | Printing area,<br>Special issue,<br>P. no. 44- 46.<br>August -2021 | 2394-5303 | 7.891 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 25 | Sahitya, Samaj Ani Madhyame | Current Global Reviewer P.no 106-107 05 September. 2021 | 2319-8648 | 7.139 |
| 26 | Parvartanvadi Chalvalicha disha Ani dasha | Current Global Reviewer P.no 98-101 Sept. 2022 | 2319-8648 | 7.139 |

Articles / Chapters published in Books

| Sr. **No.** | Title with page nos | Book Title, editor & publisher | ISBN No | Whether Peer reviewed. |
|---|---|---|---|---|
| 01 | Marathi Bhasha Ani Prasarmadhyame | CHITKALA Arts & Science College Gadhi | 978-93-81921-10-4 | Peer Reviewed |
| 02 | Marathwadyatil Gramin Kandambariche Swarup | Marathwadyatil Kandambariche SwarupP.V.P. College Patoda | 01/11/2013 | Peer Reviewed |
| 03 | Lulekarancha Sahityatil Marathwada | Prlhad Lulekar yanche Samagra Sahitye | 978-8-93-83672-24-0 | NIL |
| 04 | Gramin Sahitya Ani Badalte Vastav | -- | -- | -- |
| 05 | Samajiktela Kalatmak Rup Denara Sahityasmarat: Annabhau Sathe | Annabhau Sathe : Samatadhistit Samaj Vavestheche Tatwadnya | 978-93-88732-09-3 | -- |
| 06 | Swatantrya ladhayat marathi bhasha ani sahitayche yogdan | Sidhi Publishing House, | 978-81-955479-7-5 | -- |

Papers presented in Conferences, Seminars, Workshop, Symposia

| Sr. No. | Title of the Paper presented | Title of Conference / Seminar | Organized by | Whether level |
|---|---|---|---|---|
| **01** | Dalit Sahityatun Chitrit Zalele Samajik Wastav | Dalit Sahitya Ani Samkalin Samaj | Shankarrao Gutte College Dharamapuri | National |

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गढी, ता. गेवराई जि. बीड.

## मराठी विभाग

## प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे

## वृत्तमानपत्रातील लेख

| अ.क्र | लेखाचे नाव | वृत्तपत्र | दिनांक | लिंक |
|---|---|---|---|---|
| 1 | लोककल्याणाचा आदर्श, सर्वमान्य अद्वितीय राजा- छत्रपती शिवाजी महाराज | दै. चंपावतीपत्र | १९ फेब्रुवारी २०१९ | पान क्र. ४ |
| 2 | माझा मराठवाडा : काल आणि आज | दै. चंपावतीपत्र | १७ सप्टेंबर २०१९ | पान क्र. ४ |
| 3 | 'महिलांचे विचारविश्व व्यापक व्हावे' | दै. दिव्यामराठी, मधुरीमा | १७ मार्च २०२० | https://digitalimages.bhaskar.com/divyamarathi/epaperimages//17032020//16madhurima-pg3-0ll.jpg |
| 4 | 'आता सामोरे जावेच लागेल' | दै. झुंजारनेता | २४ मार्च २०२० | http://www.zunjarneta.com/news/131192 |
| 5 | 'माणसाच्या अस्तित्वाची नवी लढाई' | दै. दिव्यामराठी | ०५ एप्रिल २०२० | https://divyamarathi.bhaskar.com/news/coronavirus-127112712.html |
| 6 | 'अनलॉक' अनिश्चित उत्तराच्या दारातून ....! | दै. झुंजारनेता | २३ जून २०२० | https://www.zunjarneta.com/news/135583 |
| 7 | 'गड्या आपला गाव बरा...' | दै. झुंजारनेता | १२ ऑगस्ट २०२० | http://www.zunjarneta.com/news/138476 |
| 8 | 'आजच्या बळीला राज्य नको, चांगले दिवस हवेत...! | दै. झुंजारनेता | ०१नोव्हेंबर २०२० | पान क्र. ४ |
| 9 | 'बर्थडेचे झिंगाट, आता व्होऊ दे व्हायरल ..' | दै. झुंजारनेता | ०८ डिसेंबर २०२० | https://zunjarneta.com/news/140298 |
| 10 | 'लॉकडाऊन' परिणाम नव्हे परिमाण | दै. कार्यारंभ | १० एप्रिल २०२१ | https://karyarambh.com/news/124977#sthash.owkez83b.dpbs |
| 11 | 'कर्ता माणूस सुजाण राजकारणी' | दै. चंपावतीपत्र | ३१ मे २०२१ | पान क्र. ४ |
| 12 | 'श्वासाची दमछाक अन् व्यवस्थेची हतबलता....' | दै. झुंजारनेता | ०९ जुलै २०२१ | https://zunjarneta.com/news/147247 |
| 13 | 'दसरा आणि मेळावे' | दै. कार्यारंभ | १४ आक्टोबर २०२१ | https://karyarambh.com/news/137546#sthash.WfHB8hNK.BNJ1xyPN.dpbs |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14 | 'प्रवास- स्वागत आणि निरोपामधल्या काळाचा' | दै. झुंजारनेता | १ जानेवारी २०२२ | https://zunjarneta.com/newsdl/152686 |
| 15 | 'सुख म्हणजे नक्की काय असत? | दै. दिव्यमराठी, मधुरिमा | २५ जानेवारी २०२२ | https://epaper.bhaskarassets.com/divyamarathi/epaperimages/25012022/24madhurima-pg2-0ll.jpg |
| 16 | सुधारणावादी साहित्याचे प्रेरणास्त्रोत म. जोतिबा फुले. | दै. कार्यारंभ | ११ एप्रिल २०२२ | https://karyarambh.com/news/148483#sthash.G9ypOW7y.XRgyjwgy.dpbs |
| 17 | 'लोकहित हीच दादांच्या राजकारणाची प्रेरणा ..' | दै. चंपावतीपत्र | ०९ आक्टोबर २०२२ | पान क्र. ४ |
| 18 | शिवशाही धोरणात रुजवावी लागेल | दै. झुंजारनेता | १९ फेब्रुवारी २०२३ | पान क्र. ४ |



प्रासंगिक }{ रमेश रिंगणे

स्वातंत्र्य, समता, बंधुतेच्या तत्त्वावर समाज उभारणी व्हावी आणि हे घडताना माणूस म्हणून स्त्रियांचा दर्जा अबाधित राखला जावा.

# महिलांचे विचारविश्व व्यापक व्हावे

आज प्रत्येक क्षेत्रातील महिलांचा पुढाकार आणि वावर वाखाणण्याजोगा आहे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया एक नवा आणि वेगळा दृष्टिकोन प्रवर्धित करतात. याच्या पाठीमागे महिलांमध्ये असणारी, हाताशी आलेल्या संधीला सोनेरी परिणाम देण्याची क्षमता, ही वृत्ती असते. पण जसजशा रूढी, प्रथा आणि परंपरा बळकट झाल्या, तसतसे अनेक निर्बंध तयार झाले. आमच्या विचारांच्या ओझ्याने त्या नियंत्रित वा चलित देखील झाल्या. हेच चित्र आज पाहावयास मिळते. सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशा आपल्या सोयीच्या नियम, कायदे आणि दुय्यम वर्तणुकीने स्त्री तेव्हाही जळत होती, आजही जळते आहे. अर्धे विश्वच स्त्रीव्यापी असूनही, या बहुसांख्यिकी समुदायाला दुर्लक्षित ठेवलेले आहे. मानवी समुदायाची अपरिमित हानी होऊनदेखील आजही तेच ते संकेत, तशाच प्रथा, अव्यवहार्य रूढी, आणि पुरुषी मानसिकता सबलेला अबला दर्शवून, ठरवून आपले निर्णय, विचार, अपेक्षा त्यांच्यावर थोपतो आहोत. स्त्री पदोपदी डावलली जाते, अपमानित केली जाते. म्हणून कुसुमाग्रज म्हणतात तसं 'समान मानव माना स्त्रीला, तिची अस्मिता खुडू नका, देवी म्हणुनी पुजू नका, वा दासी म्हणुनी भजू नका.' ही सुधारणावादी लस पुरुषी विचाराला आता द्यावीच लागेल.

आज त्याअनुषंगाने महिलांची वाटचाल अधोरेखित होत आहे. त्याही स्वतःप्रति सजग होत आहेत. स्त्रियांनीही आता सर्वात अगोदर स्वतःला, स्वतःच्या क्षमतांना ओळखणे गरजेचे आहे. प्रचलित नियम, मूल्ये मानवतेच्या पातळीवर तपासून घेतली पाहिजेत. आणि केवळ पुरुषांच्याच नजरेने स्वतःला नाही पाहिले पाहिजे. स्त्रियांनीही स्त्रियांचा सन्मान करायला शिकले पाहिजे. ज्या लोकसांस्कृतिक अभिव्यक्तीने तुम्ही आपली भावना हळुवार मांडत होता, कामाच्या घाईगर्दीत त्या तत्त्वाशीच तुम्ही भांडत होता, हेही आजकाल फारसे दिसत नाही. भूमिका बदलली की वर्तन बदलणे हे धोकादायकच. व्यवहार ठिसूळ असला की प्रस्थापित व्यवस्थाच त्याचा सर्वाधिक लाभ घेत असते. हे होऊ नये म्हणूनच रोखून पाहत असेल कोणी, तर त्याला थोपवून जाब विचारलाच पाहिजे. महिलांच्या सन्मानार्थ, त्यांच्या अधिकाराच्या रक्षणासाठी सर्वात अगोदर महिलाच पुढे आली पाहिजे. महिला म्हणून स्वतःचा आत्मसन्मान प्रथमतः स्वतःला करता आला पाहिजे. त्यासाठी तुमच्यातल्या बऱ्याचदा विस्कळीत होत जाणाऱ्या भूमिकांमधील विसंगती दूर करावी लागेल. मुळात आखून दिलेल्या चौकटीबाहेर पडून आचार, विचाराला तत्त्वांची आणि व्यवहाराची जोड देता येऊ शकते. कुटुंब व्यवस्थेत तर हे आपल्या इच्छेशिवाय घडूच शकत नाही. सृष्टीनंतरचे हे दुसऱ्या क्रमांकाचे निर्मिती केंद्र व्यापक करायचे की संकुचित हे आता तुम्हाला ठरवावे लागेल. म्हणजेच तुमचे विचारविश्वदेखील तुम्हाला समृद्ध करावे लागेल. जसं की सहभाग आणि हस्तक्षेप या दोन्ही गोष्टीमध्ये एक मूलभूत फरक असतो. पण या संस्कृतीने आणि आपल्या मानसिकतेने हाच फरक जाणीवपूर्वक कालपरवापर्यंत दुर ठेवला, ज्यातून व्हायचे ते नुकसान झालेच आहे. आता अधिकच्या जोखमा आपण न घेतलेल्या बऱ्या. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवतेच्या तत्त्वावर समाज उभारला जावा, आणि हे होत असताना माणूस म्हणून स्त्रियांचा दर्जा अबाधित राखला जावा.

**लेखकाचा संपर्क : ८२०८६९४०३७**


झुंजार नेता
Tue 23-06-2020
Page No. 4

# 'अनलॉक' अनिश्चित उत्तराच्या दारातून...

**झपाट्याने होत चाललेली प्रगती, विकास एकाएकी थबकतो आणि लॉकडाऊन मुळे वेळ 'पास' करण्यातच शहाणपणा सामावतो. अशीही माणसाची वाटचाल नेमकी कोठून कोठे चालली आहे. हे काही कळायचा मार्ग सध्यातरी दिसेनासा झालाय. सारे देश या कोरोना पुढे हतबल झाले आहेत. कोरोनाग्रास्तांची संख्या झपाट्याने वाढत आहे. रोज अनेक नवे हॉटस्पॉट सील करण्यात येत आहेत, तरीही बाधीतांच्या संख्येचे गुणोत्तर मात्र चालू आहे. पण आत्तापर्यंत तरी एखादी चांगली बातमी, समाधानकारक चित्र हाती आले नाही. आरोग्याची संसाधने तुटवड्यात येत आहेत, एकीकडे जीवनावश्यक वस्तुंसाठीची धावपळ वाढत आहे, तर लॉकडाऊनमुळे वाटेत, शहरात अडकून पडलेल्या अनेकांनी घर, गाव कसेबसे गाठले, पण कोरोनाशी गाठ पडलीच आणि त्याचा विळखा आणखी घट्ट होत गेला. आणि मार्ग दिसेल तसे घराकडे निघालेल्यांवर अनपेक्षितपणे काळाने झडप घालावी हे ही आणखीच वेदनादायी. अनेकांची भुकेची समस्या तीव्र होत आहे. जे घरापर्यंत पोहचलेच नाहीत त्याचे काय, आत्ता आत्ताच घरी पोहचले आहेत त्यांचीही नेमकी स्थिती कशी हताळायची. असे अनेक प्रश्न समोर येत असतांना 'आत्मनिर्भरतेच्या' अवाहनावर हळूहळू अनलॉकचा प्रवास सुरू करत आहोत.**

जीवनाचा मार्ग असा अस्थीर आणि खडतर होत जाईल हा विचार शिवलाच नसेल कधी कुणालाही. या संबंध टाळेबंदीत सामाजिक जाणीव असणारी काही व्यक्ती, संस्था, या कामी पुढे होऊन सक्रीय आहेत, ही कौतुकास्पद गोष्ट आहे. डॉक्टर, नर्स, पोलिस प्रशासन, आरोग्य कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी आणि असे सगळे जीवाची पर्वा न करताही सातत्याने न थकता कोरोना विरोधी अभियान चालवत आहेत. तसं तर इथे भारतीय माणूस म्हणून आपल्याला आणखी काही दिवस तरी गंभीर व्हावेच लागणार आहे. अशातही आपले वेगवेगळे उत्सव, टाळ्या काय, मरकज काय आणि दिपोत्सव काय साजरे करून झालेच आहेत. परत त्याला रंगही देऊन झालाय फटाक्यांचा, तोफांचा आणि धार्मिकतेचाही. पण हे माणसावरचे आक्रमण आहे, हे काही डोक्यात आलले नाही आपल्या. पण काहीही होवो लॉकडाऊनचा एकेक टप्पा पुर्ण करून अनाकलीय अशा द्विधास्थितीतही अनलॉकच्या अनिश्चित उत्तराच्या दारात येऊन उभे आहोत. तेव्हा जुनाच का होईना, पण हे सगळे सावरणारा, आवरणारा विचार नव्याने करावाच लागेल.

हा आता एका देशाचा, प्रदेशाचा प्रश्न उरला नाही तर तो जागतिक स्वरूपाचा बनला आहे. आणि आपण सगळे सध्यातरी निरूत्तरीत. भारत हळूहळू या कोरोनाच्या कचाट्यात, विळख्यात अडकत चाललाय. रूग्णांची संख्या वाढू लागली आहे. शहरची शहर क्वारंटाईन करण्याचा दारात आपण उभे आहोत. भारतातील सगळी महानगरं कोरोनाच्या गडद भितीमध्ये वावरत आहेत. ग्रामीण भागाकडेही त्याची वाटचाल सुरू झालेली आहे. आणि ते आपल्यासाठी भयावह असणार आहे, कारण कायमच सोयी सुविधांपासून दुरावलेला ग्रामीण भारत कसं तोंड देणार आहे, या कोरोनाला. काय आहे तिथे



विलगिकरण करण्यासारखे. कसं करता येईल क्वारंटाईन स्वतःला, जिथं सामुदायिक जीवनशैलीने कुटुंबच्या कुटुंब अनेक पिढ्या चालत आलेले आहेत. कसल्या वेगळ्या खोल्या न कसलं जगण्याचे अंतर माहितच नाही. म्हणून या परिस्थितीत ग्रामीण भारत कसा अलिप्त राहील हे ही एक आव्हानच. तिथपर्यंत जर हा कोरोना गेला तर परिस्थिती सावरणे खूपच अवघड जाईल. हे शासन-प्रशासनाला देखील ठाऊक आहे. तेव्हा अशा परिस्थितीत आपल्या विकासाच्या, नियोजनाच्या बाबतीत कोरोनाच्या साथीने प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कल्पना व अपेक्षेच्या उत्तुंग भराऱ्या मारणाऱ्या माणूस नावाच्या प्राण्यासमोर पहिल्यांदाच विश्वव्यापी संकट निर्माण झाले आहे. जगाशी कन्येक्टिव्हिटी वाढवा म्हणणारी धोरणे 'स्टे अँट होम' मध्ये गुंतली. आणि कर्तृत्वाला सिमा नसतात म्हणणारी बुद्धी 'वर्क फ्राँम होम' करू लागली. गेल्या काही वर्षात सार्वजनिकता संपुष्टात आणल्या गेली आहे, ग्रामीण रूगणालयांची आजची अवस्था अत्यंत वाईट आहे. शहरांच्या भरमसाट विकासाच्या नावाखाली खेडे दुर्लक्षित राहिले ते कायमचेच. पण या जागतिक इष्टापतीने पुन्हा याचा विचार करायला लावला आहे. इथला ग्रामीण भाग आणि सर्वसामान्य माणूस वेठीस धरला जात आहे. ज्यामुळे आपली अत्तापर्यंतची वाटचाल पुन्हा पुन्हा तपासण्याची वेळ आली आहे. गेल्या सत्तर वर्षाच्या काळातील आपल्या विकासाची वाटचाल नेमकी कशी आहे, असा प्रश्नही या कोरोनाच्या निमित्ताने समोर येत आहे. याही परिस्थितीत संविधानाचा पगडा असावा आपल्यावर व विज्ञाननिष्ठता यावी दृष्टीक्षेपात. पण आपल्या भावनिकतेचा वापर अशासाठी कधी झाला नाही, होणार नाही. त्याचा फायदा घेतला जाईल विकासाच्या, समस्यांच्या पातळीवर डोळेझाक करण्यासाठी अन् अविवेकाने माथी भडकावण्यासाठी.

**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे**

मुळात भारतीय माणूस प्रचंड आशावादी आहे. पटकन एखादी कृती, विचार आपण सहज म्हणून स्वीकारतो. म्हणूनच परकीय राजवटींच्या सावटाखाली आमच्या कैक पिढ्या खपल्या आहेत. एकेकाळी गौरवशाली इतिहास, ज्ञान, तत्त्वज्ञान, संस्कृती मिरवणारा भारत आज दुसऱ्याचे बोट धरण्यासाठी धडपडतांना दिसतो. आपलं म्हणून असं काहीच कुठे नाही. तंत्रज्ञान, संशोधन निर्माण करण्यात नाही, तर ते वापरण्यात पहिला नंबर आहे आपला. शोधक दृष्टी, विचारच डोक्यात नाहीत आपल्या. वाऱ्याकडे तोंड करून उभे रहाण्यातच आपले पुढारलेपण सामावलेले आहे. म्हणून तर या वैज्ञानिक युगात आणि कोरोना सारख्या जागतिक इष्टापतीतही आपण टाळ्या, मरकजचे आयोजन आणि दिपोत्सव साजारे करत असतो. हे करण्या पेक्षा शास्वत विकास जो आमच्या धोरणात मिरवतो, तो प्रत्यक्षात उतरावा. आणि यात ह्या इव्हेंटसारखा सर्वांचा सहभाग असला तर किती बरे होईल. तसही आपल्याला कष्ट नको सुख हवे, काम नको दाम हवा, प्रयत्न नको उत्सव हवा अशा वृतीमुळे सशक्त भारत घडण्याचा अन् घडवण्याचा प्रश्न आणखीच गंभीर, खंबीर वाटायला लागतो.

ज्या मनुष्यबळ आणि बुद्धीच्या जोरावर माणूस सर्व सीमा लांघत आला आहे. त्याच्याच दारात हा व्हायरस येऊन उभा आहे. अशावेळी अमर्याद महत्वकांक्षी अशा माणसाला नकळत सीमीत व्हावे लागत आहे. आशावादी असा प्रचंड अपेक्षेचा हा माणूस म्हणून मिरवणारा प्राणी विलगीकरणाच्या तिढ्यात अडकवून टाकला आहे, या छोटयाशा कोरोनाने. तेव्हा बरच काही आहे जे मुद्दाम आपण सोडत आलोय, त्याचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे. टाळ्या, मरकज आणि दिवे लावण्याने काहीच होणार नाही. हे माहित असतानाही ज्या भाबडेपणाने हे सारे करतो, तो अगोदर सोडावा लागेल. अशा संकटकाळात आपल्या विकसित होण्याच्या प्रवाहात कायम दुय्यम स्थानी ठेवली ती शेती आणि शेतकरीच उभा आहे. ती दोन्ही क्षेत्रे वंचित न राहता कशी आणखीन बळकट करता येतील हे पहावे लागेल. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणाच मोडून पडणं हे दुर्दैवी आहे. शहरीकरण, औद्योगिकीकरण या प्रक्रियेत शेती आणि ग्रामीण भाग दुर्लक्षित होणं कधीही खेदजनकच. शहरापासून खेड्यापर्यंतची सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, सार्वजनिक शिक्षण, सार्वजनिक वितरण प्रणाली यांना बळकटी द्यावी लागेल, एवढ्यावरच न थांबता शेती, माती आणि त्या संबंधित अनेक व्यवसायाची नव्याने मांडामांड करावी लागणार आहे. हजारो उद्योग एकाच ठिकाणी उभारण्यापेक्षा त्याची वर्गवारीनुसार रचना करून, विभागणी केली आणि मनुष्यबळ सहज उपलब्ध होईल अशा अगदीच खेड्यापाड्या पर्यंत ते न्यावे लागतील. कमीत कमी तालुकास्तरावर तरी काही उद्योग उभारले जाणे गरजेचे ठरत आहे. तेव्हाच सर्वसमावेशक विकास काय असतो हे प्रत्यक्षात येईल. आणि जागाच्या तुलनेत भारत उभा आसेल. आणि शासन कर्त्या लोकांच्या हे लवकर लक्षात येवो, तोच असेल खरा दिपोत्सव. तेव्हा, कोरोनाच काय अशा येणाऱ्या अनेक संकटाना आपण सक्षमपणे सामोरे जाऊ.

# गड्या आपला गाव बरा...



मोठ्या थाटामाटात शहरीकरण वाढलं, औद्योगिकीकरण झाले, विकासाच्या नावाखाली अनेक कायदे, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे अमलात आली. यातले तर बरेचसे मोठा गवागवा करून आणण्यात आलेले अमलात येण्याआधीच बंद करून पुन्हा पुन्हा नव्याने समोर ठेवण्यात आले. अनेक वर्षाचे अनेक संकल्प आपल्या पुढ्यात सुटले, आर्थिक, सामाजिक विकासाचे विविध अश्वासने दणाणून गेली. वाजत गाजत योजना आल्या अन् गेल्याही. असे चक्र चालतच राहिले. मागचा रस्ता बंद झाला आणि पुढचा मार्ग अनिश्चित असतांनाही केवळ चालत रहायचे, यात पिढ्यान पिढ्यांची चालढकल आपल्या जीवनशैलीत पक्की मुरत आली. असं सारं आहे एकूण स्वातंत्र्या नंतरच आपलं जगणं. विचारांचा तसाच अपेक्षांचाही आवाका वाढू लागला. जे जवळ आहे त्याचा आपण कधीच विचार करत नाहीत. म्हणजे असं की एखादी गोष्ट, काम, कला किंवा कौशल्य अवगत असल्यास त्यातच पारंगत व्हायचे प्रयत्नही होतांना दिसत नाहीत. किंवा तसं काहीच न करता, जवळ नाही, हातात नाही ते साधण्याच्या केविलवाण्या स्थितीत मात्र आपण सारे कायम जगत आलो आहोत. 'हातचं सोडून पळत्याच्या मागं धावनं' हे तर असतं. नेमकं हेच जागतिकीकरण आपल्या वाट्याला आलं आहे. खाजगी असं आता काही उरलच नाही आयुष्यात. तसं तर सगळ्या सार्वजनिक्तेला वेडा पडला या खाजगीपणाचा. अन् याच उदारीकरणात अडकत, गुंतंत गेले सारे काही.

याच अवस्थेचा फायदा बाजाराला झाला आणि जगातली सर्वांत मोठी बाजारपेठ म्हणून भारत नावारूपाला आला. जागतिकीकरणात मध्यवर्ती असणाऱ्या नफ्याला उत्पादन महत्त्वाचे असते. म्हणूनच मग बेरोजगारांचे, तरूणांचे लोंढेच्या लोंढे शहरातल्या गर्दीत अलगद सामावत गेले. आणि गावेच्या गावे अक्षरशः ओस पडत गेली. हातच टाकून पळण्यासाठी लोभस झगमगाट खुणाऊ लागला. इथंच तर मग विचार, कर्तृत्वाची धग अन् मनगटाची रग यातली तफावत रूंदावत गेली. अणि ह्या तकलादू, स्वप्नाळू डोक्यात मात्र हे यायच्या आत, त्या कामी येणाऱ्या मनुष्यबळाच्या तात्पुरत्या गरजा पूर्ण करून अभासी जगण्याची सवय जोडल्या गेली. आणि हीच स्थिती जाणीवपूर्वक कायम ठेवली की सगळं कसं अलबेल वाटतं. काही अपवादात्मक स्थिती सोडली तर बहुसंख्य परिस्थिती समसमानच राहिली. काळ जसजसा सरकू लागला तसतसे हाती उरणारे शुन्य भयान वाटायला लागले. याच रेट्यात निभाव न लागलेली कृषी परंपरा गांगरून गेली. पिकतं तिथं विकत नसतं, अन् विकतं तिथ पिकवता येत नाही. ह्या चक्रात अडकलेली भारतीय अर्थव्यवस्थेची कणखर कृषी व्यवस्था हळूहळू कमकुवत होत गेली. निसर्गाचे तडाखे आणि कर्त्यांची जाणिवपूर्वक डोळेझाक या दोन्ही पातळीवरली दरी कायम वाढतीच राहिली.

आभासी जगाची ही रीत कळलीच नाही. जणू स्वप्नातले प्रत्यक्षात यायला काहीसाच काळ, अवधी उरला आहे, याच अविर्भावात आपण आपला बाड बिस्तरा गुंडाळत गेलो. अन् ठेचाळत, अडखळत झगमटाच्या ओझ्याखाली चेपणारी जीवनशैली नकळतपणे स्वीकारत गेलोत. वाटलं होतं साधता येईल काहीना काही. हाताला काम मिळेल, पुढच्या जगण्याचे तंत्र कळेल आणि चालण्याचा मार्ग सापडेल. चार घास समाधानाचे खाता येतील, आपलेपणाचा उबदार निवारा करून समाधानी राहता येईल. अन् पुढच्या पिढीचे बोट धरून दाखवता येईल नव्या काळाचा नवा जीवनमार्ग. ही बऱ्याच दिवसांपासूनची तगमग होतीच, पण हाती म्हणावं असं काही कधी लागले नाही. म्हणजे फरफट ही तशी चालूच होती कायम, पण आशा होती उद्याची. म्हणून निभावून न्यायचं जगण्याला, जीवनाला, आपल्या सोबत सर्वांना बाकी काय. दर नव्या वर्षाला नवी नवी स्वप्ने दाखवली गेली, जुन्यालाच पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या साच्यात आणि ढाच्यात सादर केले गेले. अन् आपलंही तसच तेच ते. बेगडी अविर्भावाचा मुलामा पांघरूण हसत हसत चांगल्याचा भास निर्माण करत राहणं.

पाठीवरल्या संसाराचं ओझ टेकवाव, उतरावं म्हणून सारा आटापीटा. पण आत्तापर्यंत तरी यातलं काही साधता आलय असं वाटत नाही. अनेक वाटा चोखाळल्या गेल्या, अनेक रस्ते सापडत गेले, पण जे जमून यायला पाहिजे होते ते काही हाती लागलेच नाही. मग सुरू राहिली जीवघेणी धावपळ हातावरल पोट म्हणत. जगणं धुसर होत असतांनाच पावलागणीस स्वप्न अस्थिर व्हायला लागली. टिव्हीचा रिमोट कंोल हाती असतानांही न आवरता आलेली बहुपर्यायी धांदल, मोबाईल आणि तशाच वेगवेगळ्या माध्यमातून पैशाने विकत घेतलेली विविधता, कष्ट आणि पैशाचा न घालता आलेला मेळ म्हणून हे करू का ते करूची उडालेली धांदल, माध्यमांची विपुलता असतांनाही काही ठोस असे दृष्टीस पडत नाही. ह्या साऱ्यांच्या घाईगर्दीत हेलकावेच जास्त वाट्याला आले. स्थिर, ठोस असं काहीही साधयला जमलच नाही.

हे प्रकर्षाने जाणावायला लागले ते कोरोनाच्या काळामुळे. जग लॉकडाऊनमुळे स्तब्ध झालेले असतांना, आपल्यालाही या परिस्थितीतून सावरण्यासाठी, निभावून निघण्यासाठी गाव जवळ करावे लागले. जगण्याच्या संघर्षात आणि भेदरलेल्या वातावरणात गड्या आपला गावच बरा म्हणण्याची वेळ आली. हाताशी काम अन् गाठीशी दाम नसला तरी, जगण्याची, सुरक्षिततेची खात्री मात्र इथेच वाटायला लागली. जीवनाला आकार देण्याच्या धावपळीचं नाव शहर, पण अनेक वर्षानंतरही हा आकार सुरक्षित, अबाधित वाटला नाही. जगण्याच्या लढाईत विश्वास वाटला तो गावचाच. कारण स्थलांतर, बेरोजगारी आणि यंत्रावताराचा भडीमार या गर्तेत कुणालाही या शहराने कामाची हमी दिली ना जीवाची. इतक्या वर्षातही आपत्कालीन परिस्थितीत काही दिवसांपुरती का होईना जीवनावश्यक गरजांची पुर्तता करता न येणं, हे खरं अपयश म्हणावे लागेल आधुनिकतेचे, व्यवस्थेचे, शासन-प्रशासनाचे आणि तुमचे आमचे सुद्धा. विस्थापित होतो तसाच विस्थापित म्हणूनच फिरावे लागते आहे. आणि असे फिरतांना जी जमवा जमव करावी लागली, तीच आताही नव्याने करावी लागली, यातच सारं येतय. जसे गेलो तसेच परत यावं लागलं, फक्त कपडे बदलले. खेड्याच्या पेहरावानीशी शहरात गेलो अन् शहरातले राहणीमान गावाकडे घेऊन आलो, हाच काय तो दिसण्यातला बदल. एवढयापुरतीच ही सगळी धावाधाव मर्यादित राहिली. मग भुतकाळाकडे निरखून पाहताना जाणवायला लागते, बदल झालाच नाही काही, काळ मात्र सरकत गेला. हातात काहीच शिल्लक उरले नाही. शहराकडे जाताना जी लगबग होती, ती फक्त परावृत्तीत झाली जीवघेण्या धांदलीत. आणि पुन्हा जीव मुठीत घेऊन गाव जवळ करावा लागला.




**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे**
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी.
संपर्क - ८२०८६९४०३७


---



## गाथेतील तरंग

डॉ. विजयकुमार फड
भाग -१२४२


**तुका म्हणे असे हातींचें कांकण।**
**तयासी दर्पण विल्हाळक॥**

हातच्या कंकणाला आरसा कशाला? असे आपण प्रसंगानुरूप अनेकवेळा म्हणून जातो. अर्थात स्पष्ट असलेल्या गोष्टीला सिध्द करण्यासाठी पुराव्याची आवश्यकता नसते. हे सत्य असले तरीही बऱ्याचवेळा गोष्ट स्पष्ट असूनही माणूस ती पटवून दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याचा हा प्रयत्न बऱ्याचवेळा स्वार्थापोटी असतो. आपल्या हातून एखादी कृती घडली असल्याचे इतरांना माहिती असले तरीही त्याचा डंका वाजविल्याशिवाय माणूस राहात नाही. ज्यातून मोठेपण मिळणार आहे. मान-सन्मान वाढणार आहे. त्या गोष्टी पुन्हा पुन्हा समाजासमोर आणण्याचा माणसाचा प्रयत्न असतो. त्याचबरोबर एखादे दुष्कृत्य आपल्या हातून घडले व ते लोकांना स्पष्ट जाणवत असेल तरी सुध्दा माणूस ते झाकण्याचा प्रयत्न करतो. उघड-उघड पटत असतांनाही झालेल्या चुका आपण केल्याच नाहीत. हे दाखविण्यासाठी माणूस त्या झाकण्याचा प्रयत्न करतो. खरे म्हणजे सत्य हे सत्यच असते. जे उघड सत्य आहे त्याला पटविण्याचा किंवा सत्य नसल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करण्याची गरजच नाही. हातचे कंकण आपल्या डोळ्याला सहज दिसत असतांना त्याला हातात आरसा घेऊन पाहणे म्हणजे निव्वळ वेडेपणा होय. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणजे असे हातींचें कांकण। तयासी दर्पण विल्हाळक॥

झुंजार नेता
Tue 08-12-2020
Page No. 4

# 'बर्थडे'चे झिंगाट, आता होऊ दे व्हायरल...

आज माणसाच्या हाताशी मुबलक साधनं आलेली आहेत. माणसाच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा उंचावत आहेत, विविध प्रकारच्या क्षमता विकसित होत आहेत. अनेक क्षेत्रातील आपला वावर वाढू लागला आहे. हे सकारात्मक म्हणावे असे चित्र आहे. असे होत असतानाच आपल्या निवडीवरचे नियंत्रण मात्र सुटत चालले आहे, सगळीकडच्याच विपुलतेत आपण मात्र वाहत चाललो आहोत. या बहुविध साधनांची उपयुक्तता जीवनशैलीच्या व्यामिश्र सरमिसळीला सहज करण्यात आहे. पण यातले काहीच होताना दिसत नाही. जे काही हवे, नको त्याचा आधीच पुरवठा करणाऱ्या जाहिरातींनी गजबजलेल्या बाजारात मागणीला कुठलाही अर्थ उरत नाही, असंच झाले आहे सारं. मोबाईल,टॅब, लॅपटॉप, कॉम्प्यूटर आणि इंटरनेट हा माहितीचा प्रचंड स्त्रोत आणि त्यावरील वेगवेगळ्या साईटस् सहज उपलब्ध आहेत. एकप्रकारे जगभरातील सारेच्या सारे प्रश्न आणि उत्तरे या (Internet) अंतरजालाभोवतीच फिरत आहेत. एवढेच नाही तर आज हर एका किचनमधल्या फोडणीला यु-टुबच्या रेसीपीचा तडका, अन् दारातल्या रांगोळीला डिझीटल रंग असतोच असतो. इतके ते व्यापक झाले आहे. नव्याहूनही नवे नवे दृष्टीस पडायला लागले आहे. अन् याचाच या सगळ्या माध्यमावर इतका गलका व्हायला लागला की, विचार करायला सवडच नाही. नुसती धांदल वाढली आहे, यातून मात्र आवड हरवत चालली आहे, ही खंत आहेच. म्हणून हा आटापीटा बाकी काय.




आणि मग हे असे व्हायला लागले की आपोआपच भाबड्या कल्पना, विचार, स्वप्ने, दिखावे वाढत जातात आणि या जमान्यात चोहोबाजूला नुसता कॉपी-पेस्टचा सुळसुळाट होतो. याची त्याची बरोबरी करण्यातच सगळा वेळ खर्ची पडतो. आणि मग यात आपण स्वतःहून नकळतपणे हळूहळू गुंतत गुंतत जातो. 'बर्थडे' हे एक असेच नवे झिंगाट सध्या खूपच जोरात आहे. रोज नव्या नव्या शकलीने, नव्या नव्या पद्धतीने हा 'बर्थडे' साजरे होताना आपण पाहतोय आणि करतोयसुद्धा. 'वाढदिवस' असेही नाव त्याला आपल्या भाषेत आपण दिले आहे. प्रत्येकाच्याच जीवनात दरसाली एकदा येणारा हा दिवस आहे, किंवा त्याला आपण जन्माची तारीख म्हणू. याला लागूनच first month, second month, third month (birthday, anniversary) असेही एक खुळ सुरू होऊ पहात आहे. असेच दिवस पकडून मग आपल्या आनंदाचा, समाधानाचा शोध सुरू होतोय.

या गृहीतकामागेच सर्वसामान्यांच्या हातातला मल्टीमिडीया धावतोय, अन् आपल्यालाही धावायला लावतोय. प्रत्येकाच्या जगण्याची सकाळ अशाच Action AmoU Reaction ने देण्या घेण्यातच होऊ लागली आहे. नुसती झुंबड आहे सध्या असे वाढदिवस साजरे करायची. माझ्यासह अनेकांना हा जन्म आठवला तो या बहुरंगी माध्यमाकडूनच, एकतर गुगल अकाऊंटला ती तारीख पुरवावी लागते म्हणून. नाहीतर यातल्या बऱ्याचशा तारखा शाळेत नाव नोंदवताना ठरलेल्या आहेत, तरीही मोठ्या धुमधडाक्यात तो दिवस साजरा करतोय आपण. जसे जाणूनबुजून आंधळ्याचे सोंग धारण करून स्वतःलाच फसवत राहण्याचा हा प्रकार आहे, मात्र असा विचार केला तरी ते पटणार नाही हेही खरे. एखादी खास घटना घडून गेलेल्या दिवसाची आठवण इथपर्यंत ते ठीक आहे. काही क्षण असतात असेही की ते आठवणीत राहतातच, त्यांचा ऊत्सव होत असतो. पण 'बर्थडे' म्हणजे वाढदिवस हे काही गणित कळले नाही. याने आयुष्यातील दिवस वाढतात की, हेच वाटून मिळालेले दिवस आहेत? किंवा मग बाजाराने निर्माण केलेले खात्रीशीर गिऱ्हाईक तर नाही ना? असे प्रश्न तयार होतात. बरं नसेल तस तर, हाजोरोंच्या हाजारो शुभेच्छा असल्यावर आचार, विचार बदलला पाहिजे, आचरण, वर्तन घडले पाहिजे. पण तसे घडताना दिसत नाही. हे म्हणजे 'पळण नाही, चालणही नाही अन् धापा देण्यातच वेळ निघून जाई' असं आहे. वरून या सगळ्यांचे आपल्या सारख्यांना निराळेच मोल.



रमेश बाबासाहेब रिंगणे
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर,गढी.
संपर्क - ८२०८६९४०३७

माध्यमावर असल्या अमाप पीकाला कायम बहर आसतो. हे सगळं खूप मजेदारही असत. काही वाचनीय, काही श्रवणीय तर काही बरचसं तापदायक सुद्धा. चांगल्या भावनाही असतात याच्या पाठीमागे, फरक अतिरिक्त, अवास्तवतेचा असतो. मोबाईल फोनचा वापर किती बहुढंगी करता येतो हे ही दिसून येते. वाट्सअँप, फेसबुक हा फॉरमॅट तर गच्च भरलेलाच असतो. एवढाच मर्यादीत वापर करणारे मात्र अशा माध्यमावर 'होऊ दे व्हायरल' म्हणत खूपच अग्रोसर (active) असल्याचे दिसते. आज घरातल्या प्रत्येकाचे असे वाढदिवस साजरे होत आहेत. तशी ही अत्यंत चांगली गोष्ट आहे. पण विचारांच्या, वर्तनाच्या पातळीवर वाढत चाललेला तकलादूपणा, अनुकरण आणि अतिरेक माणूसपणाला जास्तकाळ मानवणार नाही हेही खरे. केवळ हेच नाही अशा अनेक इव्हेंट आहेत ज्यामुळे आपण आपला आवाका, कक्षा विसरत तर नाही ना, याचा विचार केलेला बरा. जे जे काही मिळवायचे आहे, साधायचे आहे त्याची वाट पहात बसण्याऐवजी प्रयत्नपुर्वक त्या वेळेची संधी साधने गरजेचे मला वाटते. म्हणूनच अशा अवघडलेल्या अवस्थेत कायम राहणे बरे नव्हे. म्हणूनच आपण अगोदर सावरले पाहिजे. आणि येणाऱ्या पिढीला या वरवरच्या, तकलादू भासातून बाहेर काढणे आणि मूल्यात्मक, वास्तविक दृष्टी प्रदान करणे हे खरे आव्हान असणार आहे.

कार्यारंभ
Saturday 2021/04/10

काळाला सुसंगत वर्तन आणि आचरण ठेवले की उज्वल भविष्यकाळाकडे घेऊन जाणाऱ्या पायवाटा तयार होत असतात. अन् चालणाराला याच वाटा खाचखळग्यातून, आडवाटा, वळणावळणातून एकप्रकारचा अनुभव प्रदान करत जातात. व यातूनच तुमच्या आमच्या जगण्याला समृद्धी येत असते. असंच मानवी इतिहास सांगत आलाय. पण कधीकधी हे आपण माणूस म्हणून जाणीवपूर्वक डोक्याआड करत चालण्याचा प्रयत्न करतो आहोत. म्हणून ज्याला पाहिजे तसा तो आपल्याला ओढत नेण्याचा अट्टाहास करत जातो. आशाच गर्तेत मानवी वाटचाल सोयीस्कर होता होताच नकळत भरकटत गेलेली उदाहरणेच जास्तीची सापडतील. सध्याही कोरोना काळातील ही स्थिती तशाच अवघडलेल्या स्वरूपाची आहे. म्हणून डोळ्यात कायम भविष्याचा वेध असावा हे खरे, पण पायाशी मात्र भल्या बुऱ्या प्रसंगाची (इतिहासाची) जाण असणे गरजेचे आहे असे माला उगाच वाटते. कारण अशाच विपरीत संदर्भाच्या कात्रीतले आपल्या साऱ्यांचे आजचे जगणे आहे.

लेखक- प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी.
संपर्क -८२०८६९४०३७

# 'लॉकडाऊन' परिणाम नव्हे परिमाण...

त्याच त्या वावटळी भोवती घुटमळताना गरगरून तर येणारच आहे. पुढे काय? ही अनिश्चित भिती मानगुटीवर बसून असताना, कसं रेटत न्यायचे जीवनाला, हा प्रश्न कसा सोडवायचा याच्या भोवतीच सगळं थांबले आहे. गेल्या एक वर्षभरापासून जगाला ही कोंडी काही फोडता आली नाही. पुन्हा पुन्हा संचारबंदी, जमावबंदी, आपत्ती निवारण कायद्याची अंमलबजावणी आणि लॉकडाऊनमुळे सगळेच्या सगळे थांबले आहे. कोरोना विषाणूचा प्रसार रोज नव्या नव्या रूपाने वाढतच आहे. जनजीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे, असे वाटत असतानाच पुन्हा लॉकडाऊन (टाळेबंदी) करणे भाग पडले आहे. लॉकडाऊन हा शब्द अगदीच नवखा असतानाही त्याने मना मनात घर केले आहे. कधी कल्पनाही न केलेल्या गोष्टी त्यातून आपण अनुभवल्या. पण जसं कधीकधी घाट्यातला सौदाही व्यवसायाच्या, व्यवहाराच्या उभारणीला चाल देत असतो. तशीच माणसाला जिवंत राहण्याची ही संधी आहे, जी काही न करताच संयमाने, घरात बसून साधता येऊ शकते. पण हे फारसे तुम्ही आम्ही गांभीर्याने घेतलेच नाही म्हणूनच शासनाला लॉकडाऊन करावे लागते आहे. हे तरी समजून घेण्याची ही वेळ आहे.

लॉकडाऊन तसे कोणालाही परवडणारे नाही. सर्वच आघाडीवरल्या गणिताची बिघाडी त्यामुळे होणारच होणार आहे. सर्वसामान्य माणूस ते शासन, प्रशासनालाही हे तापदायकच ठरणारे आहे. पण तुर्तास तरी हे सावरायची संधी पुन्हा मिळवायची असेल तर लॉकडाऊन अपरिहार्य आहे. काही दिवसातला रूग्ण वाढीचा वेग, मृत्यूदर पाहता त्याशिवाय दुसरा पर्याय काय? हा प्रश्न अनुत्तरीत असल्याचे वाटते. आपल्याकडे सार्वजनिक व्यवस्था, आरोग्य यंत्रणा ह्या आहे तोच भार सक्षमपणे पेलू शकत नाहीत, त्यांच्यावर आतिरिक्त ताण देऊन परिस्थिती आवाक्याच्या बाहेर जाण्याची वाट बघण्यात कसला आलाय शहाणपणा? अर्ध्या अधिकांचा रोजी रोटीचा प्रश्न आहे, शैक्षणिक प्रश्न तर आहेच आहे, असे अनेक प्रश्न आहेत. पण हे सगळे प्रश्न सोडवता येतील, त्यासाठी आपल्याला मात्र उरावे लागेल की नाही. तेव्हा शासनाने घेतलेल्या भूमिकेचे स्वागत करून सर्वांनीच सहकार्य करून यावर मात करता येईल अशी साथ देणे अपेक्षित आहे.

मागच्या तीन चार दिवसापासून या लॉकडाऊनला विरोध करण्याची जणू स्पर्धाच लागलेली आहे. ज्याची त्याची यात वेग वेगळी स्वारस्य आहेत. विरोधी पक्षाने सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध केलाच पाहिजे असेही नाही. उलट अशा परिस्थितीत शासनासोबत राहून, सहकार्य, सूचना व मार्गदर्शनही केले पाहिजे. लोकमत हे केवळ विरोधात उभे राहिल्याने, विरोधी भूमिका घेतल्यानेच जिंकता येते असे नाही तर उलट सकारात्मक विचाराने आणि परिस्थितीनुरूप भूमिकेनेही कायम स्वरूपी जनाधार मिळवता येऊ शकतो. पण हे मानणाऱ्या दृष्ट्या राजकारण्याची वाणवा अशा परिस्थितीत तीव्रतेने जाणवते.

सर्वसामान्य माणसाने तर हे गंभीरपणे घेतले पाहिजे. या बंदमध्ये पाच दहा हजार रूपायात करता येईल कशीही गुजराण. पण कोरोना उपचाराचा खर्च, आणि जगण्याची भितीयुक्त स्थिती परवडणार कशी याचेही भान ठेवावे. तसंही कोणत्याही गोष्टीचा परिणाम कसा होतो हे पाहायलाच पाहिजे का? सध्यातरी कोरोनात माणसाला माणूस म्हणून उरायचे असेल तर सर्वात अगोदर 'लॉकडाऊन' हा परिणाम नव्हे तर कोरोना आणि या परिस्थितीशी दोन हात करण्याचे 'परिमाण' आहे हे ओळखणे गरजेचे वाटते. तेव्हाच उज्वल भविष्याशी आपण आपला सांधा जुळवण्याची आशा करायला हरकत नाही.



झुंजार नेता
दिनांक : १ जानेवारी २०२२ • वार : शनिवार • पान ३

## फळरोप वाटीकेतील रोजंदारी मजूरांना १/२६ च्या दराने वेतनाच्या फरकाची रक्कम देण्यास शासनाची मंजूरी

बीड, दि. ३१(प्रतिनिधी):- कृषि खात्यांतर्गत कार्यरत असलेल्या तालुका फळरोपवाटीका बीड येथील रोजंदारी मजुरांना, कायम मजूरांच्या मासिक वेतनाच्या १/२६ दराने सन १९८८ पासूनचा फरक मिळावा म्हणून मराठवाडा सर्व श्रमिक संघटनेच्या वतीने कॉम्रेड उध्दव नामदेव शिंदे यांनी अर्ज आय.डि.ए. क्रमांक १६/२०१५ ही केस कामगार न्यायालय औरंगाबाद येथे दिनांक ०१/०६/२०१५ रोजी दाखल केली होती. या केसचा निकाल दिनांक २०/०४/२०१८ रोजी मजूरांच्या बाजूने लागला. यामध्ये सन १९८८ नंतर ज्या वर्षी मजूरांची २४० दिवसाची सेवा पूर्ण होईल त्या वर्षापासून हे मजूर १/२६ दराने फरक मिळण्यास पात्र राहातील तसेच ही केस ज्या तारखेस कोर्टात दाखल केली त्या तारखेपासून ते ही रक्कम मजुरांना मिळेपर्यंत या रकमेवर द.सा.द.शे. १० टक्के व्याज देण्याचा आदेश कामगार न्यायालयाने दिला होता. या निकालाच्या विरुध्द कृषि खात्याने हायकोर्टात रिटपिटिशन क्रमांक ६१५२/२०१९ अन्वये अपिल दाखल केले होते. या अपिलामध्ये हायकोर्टाने १० टक्के व्याजाऐवजी ६ टक्के व्याज अकारणी करून कामगार न्यायालयाचा बाकीचा निकाल कायम ठेवला. मा. हायकोर्ट व कामगार न्यायालयाने दिलेल्या निकालाची अंमलबजावणी करावी म्हणून संघटनेच्या वतीने शासनाच्या पातळीवर सतत पाठपुरावा केला. हायकोर्टात अवमान याचिका दाखल केली. तेव्हा २० आक्टोबर २०२१ रोजी शासनाने ही रक्कम मजूरांना देण्यासाठी शासकिय आदेश (जी.आर.) पारित केला आहे. त्यामुळे मजूरात आनंदाचे वातावरण तयार झाले असून, ही रक्कम लवकरच मजूरांना मिळणार असल्याची माहिती संघटनेचे सरचिटणीस कॉम्रेड उध्दव नामदेव शिंदे यांनी दिली.

# प्रवास स्वागत आणि निरोपा मधल्या काळाचा...

वर्ष येतात, जातात मात्र आपला उत्साह कायम असतो. वर्तमानात कितीही भंबेरी उडो, मात्र भविष्याचा विचार प्रचंड दिलासादायक ठरावा किवा असणार आहे, हा विश्वासच आम्हाला वर्ष अखेरीस दमदार सांगता करून, हॅप्पी एंडींग करायला प्रवृत करत असतो. शेवटी गृहीताला बाधीत करत करत, शक्यतांच्या आधाराने असाच आणखी एक टप्पा पार करण्याच्या चिंचोळ्या संधीवर तुम्ही आम्ही सध्या उभे आहोत. संधी यासाठी म्हणायचे की ती काही कधी साधली जात नाही. पण आशा, अपेक्षा काही तिच्या मुळांना सुकूदेत नाहीत. मग सुरू होत असते धडपड. हीच सुरूवातीची तडप सरत्या वर्षाच्या मोजमापात केवळ तडफडी पुरती उरते. अन् पुन्हा एका साधल्या जाणार नाही अशा संधीची अवस्था पुढ्यात येऊन उभी टाकते. हाच तर प्रवास असतो स्वागत आणि निरोपामधल्या काळाचा.

२०२१ हे वर्ष तर असेच अनाकलनीय ठरले. हाताला तारीख आणि वर्ष लिहिण्याची सवय होण्याआधीच अनेक गोंधळ घालत राहिले. मुळात जग थांबू शकते, सर्व व्यवहार ठप्प होऊ शकतात,




निर्बंध आखून पाळावे लागतात. सगळीकडे केवळ टाळेबंदीच टाळेबंदी, या भूतो न भविष्यति प्रसंगाला सामोरे जात जातच २१ च्या सालात आपण प्रवेश करतो झालो. ज्याचा कधी विचारच केला नव्हता, अशा स्थितीत हे सारे आपण अनुभवत होतो. म्हणजे या वर्षाने स्थिरावूच दिले नाही कशाकशाला. प्रश्न आणि आव्हाने यांनीच गजबजून गेला तुमचा, आमचा विचार व्यवहाराचा पसारा.

तळहातावर पोट घेऊन जगण्याच्या काळाला मागे सारून नुसतं पळणं प्रत्येकाच्या पुढ्यात येत गेल या वर्षात. काहीच निश्चित नसताना माणसाचे अस्तित्वच अनिश्चित वाटायला लागण्याचा हा काळ ठरला.


इथं माणूस अबाधित आहे. मात्र आलेल्या अनेक प्रकारच्या आपत्तींन फार फार शिकवल आहे. हाच धडा घेऊन पुढे वाटचाल केली तर अशा अनेक संकटाला तोंड देता येईल. कोरोना तर संबंध जगाच्या घशात वर्षभर घोटाळत राहिलाच आहे. पण सोबतच अनेक संकटानींही आपला प्रभाव दाखवला. जागतिक तापमान वाढ, वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईडचे अतिरिक्त प्रमाण आणि राजकीय क्षेत्रात आलेली बेपर्वाही यांनीही माणूस पुरता हैराण झाला. अतिवृष्टी, भुस्खलन, वणवा, पुर, रोगराई, इत्यादींतूनही अतोनात नुकसान झालेच आहे. सत्ता बदल आणि अस्थिर वैचारिक, राजकीय भूमिकांनीही हतबलताच वाट्याला आली आहे, अनेक भयंकर प्रसंगाला सामोरे जावे लागले. काही देशात धर्म, वर्ण, पंथाच्या नावाखाली झालेला मानवी संहारही पहावा लागला, तर अनेकांना जीव मुठीत धरून स्थलांतरीत व्हावे लागले. असा विविध आघाड्यांवरचा संघर्ष जवळपास सर्व जगानेच अनुभवला. आता या सगळ्यातून सावरत आपले वर्तन व्यवहार बदलावे लागतील.

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी.

काळाला मुठीत धरूनच इतिहासाच्या खूणा धुंडाळतत वाटचाल करावी लागेल. तेव्हाच मानवाची भविष्यकाळातली वाटचाल सुखकारक होऊ शकेल . एकूणच प्रमाणाबाहेर वाढत जाणारा घटक सगळीकडे असमतोल पसरवितो अन् आवाक्याबाहेरची महत्वकांक्षा माणसाला अव्यवहारीक आणि टोकाचे निर्णय घ्यायला लावते. मात्र ते हितावह ठरत नाही. हीच या २०२१ च्या उत्तरार्धाची कहाणी होय. म्हणून शेवटी प्रसंग कसाही असो एकोपा, आचार, विचार, धोरणे आणि तत्त्वांचा समन्वयच माणसाला माणूसपण देऊ शकतो, याच काळसंदर्भाने येत्या वर्षाला भिडावे लागेल हे नक्की.

# आता सामोरे जावेच लागेल...

**माणूस म्हणून आपण या पृथ्वीवर आता घट्ट पाय रोवून उभे आहोत. भौतिक, अभौतिक असं सारं माणसाच्या बुद्धीच्या आवाक्यात आहे. ज्ञानाच्या, तंत्रज्ञानाच्या जोरावर कशा-कशावरही माणूस सहजा सहजी मात करतांना दिसतो आहे.**



जसं की तोल संभाळायला आपण वेगाची जोड दिली, आणि दळणवळणाला, प्रवासाला सहज सोपे केले. सर्वांची आवश्यक सोय याने निश्चितच झाली देखील, पण वेगाला नियंत्रित करतांना आपल्या संयमाचा तोल मात्र बिघडू लागला. आणि मृत्यूदर वरचेवर वाढतच गेला, हे वास्तव आहे. समजा मोटारसायकल आहे तर आपल्या उपयोगाला पडता पडता तिचं काम निघावं, हा व्यवहार झाला, पण असे न होता त्यामुळे जर आपलच काम निघून हॉस्पिटलमध्ये जायची पाळी येत असेल, तर वापराची बेपर्वाही जीवघेणी होणार हे निश्चित आहे. आजची एकूणच जगाची झालेली भयावह अवस्था हेच तर सूचित करत नाही ना? असच करतो माणूस, एकदा का एखादी गोष्ट हाताशी आली की त्याचा अनिर्बंध वापर वाढत जातो. त्यायोगे जे आहे ते ते नुसते ओरबाडण्याचा प्रयत्न सर्रास होतांना दिसतो. आणि हे होत असताना निसर्गाला मात्र वरचेवर मानवी वृत्तीचे, आचारांचे अनेक तडाखे सहन करावे लागतात. अपरिमीत शक्तीचे हे भांडार आहे. त्याला जपलेच पाहिजे. पण याचाच माणसाला विसर पडत चाललाय. एकाअर्थी प्रगतीच्या नवनवीन टप्प्यावर माणूस प्रस्थापित होत होत निसर्गालाच विस्थापित करत आहे.




रमेश बाबासाहेब रिंगणे

कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर,गढी.


हे चित्र सुखावह, आनंददायी वाटत असले तरी, प्रगतीच्या नावाखाली मुळ सत्व व तत्वांची नुसती मोडतोड चालली आहे. उीॅळव-१९ (कोरोना) हे ही अशाच अवास्तव, अव्यवहारी, हव्यासाचे अपत्य असावे, असे वाटायला लागले आहे. आज जगभर याच कोरोनाने नुसता हाहाकार मांडला आहे. प्रगत, विकसित अशी सारीच्या सारी राष्ट्रे कोरोनाच्या विळख्यात सापडली आहेत. सयुक्त राष्ट्रसंघाने याला जागतिक आपत्ती घोषित केले आहे. या आधीही या जगाने अनेक साथरोगांचे थैमान अनुभवले आहेच. स्वाईन फ्लू, बर्ड फ्लू, ईबोला, इत्यादी तर आत्ता आत्ताच माणसात वावरून गेले. पण कधी नव्हे ते, या कोरोनाने वातावरण ढवळून काढले आहे. महामारीचे असे काही संकेत यातून मिळू लागले आहेत. चीन-अमेरिकासारखे रोज एका नव्या राष्ट्राशी करार करणारे, आपल्या महत्वकांक्षेचा विस्तार करणारे देश आरोप प्रत्यारोप करत स्वतःला कॉरंटाईन करून घेत आहेत. समृद्ध जीवनशैली असणारे इटलीसारखे राष्ट्र पुरते हतबल झाले आहे. आपलेही शासन-प्रशासन खडबडून जागे झाले आहे. माध्यमे संयत आणि व्यवस्था काळजीवाहू नियंत्रकाच्या भूमिकेत उभी आहेत. जो तो काहीना काही नवीन हाती येईल याच आशेने उद्या कडे पाहतो आहे. राजकारणात एकमेकांची कोंडी करणारे देश आता हीच कोंडी केव्हा फुटते, याची आशाळभुतपणे वाट पहात आहेत.

भारत तर अनेक प्रवृत्तींना घेऊन चालणारे राष्ट्र आहे. अनेकानेक गोष्टींचा पगडा आपल्यावर पडलेला आहे, आणि आपण तसंही जीवनाकडे गंभीरपणे पाहतच नाही. पण आत्ता ही परिस्थिती रहायली नाही. आत्ता जे काही करायचं ते काळजीपूर्वकच करावे लागणार आहे. कोरोनावर सध्यातरी काळजी घेणं हाच उपाय आहे. आरोग्य विभागाने, प्रशासनाने केलेल्या सुचना आणि अवाहनाला सर्वांनी योग्य तो प्रतिसाद देण, एवढेच हाती उरले आहे. पण आपल्या मुळ वृत्तीनुसार जर याच्याकडे आपण व्यापारी दृष्टिकोनातून पहात असू किंवा व्यवसायिक संधी म्हणून ती साधण्याचा प्रयत्न आपण करत असू तर, ही परिस्थिती चिघळायला उशीर लागणार नाही, याचे भान सर्वांनी ठेवणे गरजेचे आहे. सध्या माध्यमातून जी एक अलर्ट करण्याची तळमळ दिसते आहे, शासन-प्रशासनाची खबरदारी दिसत आहे, तिला हवा तसा प्रतिसाद एकत्रितपणे देणे सोयीस्कर ठरणारे आहे. तसही आपल्याकडे साधनं फारशी नाहीतच, पण एकतेच्या जोरावर अनेक प्रश्न, समस्यांना यशस्वी तोंड दिलेले आहे. हा इथल्या मातीचा गुणधर्म यावेळीही नक्कीच कोरोना विषाणूवर निश्चितच मात करेल, यात शंका नाही. पण आत्ता याला सामोरे जावेच लागेल. आज जग एका भयान परिस्थितीतून जात आहे. प्रत्येकानेही ह्या परिस्थितीला सामोरे जायची मनोमन तयारी केलेलीच आहे, हे अनेक घटना-प्रसंगातून दिसून येत आहे. महाराष्ट्र सरकारही या कोरोनाला हरवण्यासाठी जिद्दीने कामाला लागले आहे. मुख्यमंत्री व इतर सर्वजन ह्या परिस्थितीवर लवकरात लवकर नियंत्रण मिळविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करताहेत. सामान्य जनांचाही योग्य तो प्रतिसाद प्रशासन व्यवस्थेला असला पाहिजे, मिळतो आहे, हीच कोरोनाला हरवण्याची पुरोभूमी असणार आहे. तेव्हा ही कोरोनाची लढाई स्वतःला नियंत्रित करत करत, निकराने, धीराने आणि संयमाने कोरोनाच्या समुळ उच्चाटना पर्यंत लढावीच लागेल.

# कर्ता माणूस, सुजाण राजकारणी.. अमरसिंह पंडित

गेवराई तालुका म्हणजे गोदावरीचा समृद्ध काठ आणि सिंधफनेचा खळखळाट. जशी गोदामायी खोल अन् शांत तशीच सिंधफना उथळ अन् चंचल. असा हा चिंचोळ्या आकाराचा विशाल परिसर कसदार मातीचा आणि तितकाच संपन्न म्हणून ओळखला जातो. त्यामुळे सहजच सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातला गेवराईचा वावर बीड जिल्ह्यात नजरेत भरण्यासारखा राहिलेला आहे. त्याची सुरूवात श्री. शिवाजीराव दादांनी लोकहीत ही प्रेरणा घेऊन आपला राजकीय प्रवास सुरू केला तिथून झाली. आणि भैय्यासाहेब मा. अमरसिंह शिवाजीराव पंडित यांनी तोच वावर विधानसभा, विधानपरिषद असा महाराष्ट्र भर विस्तारत नेला आणि मिरवलासुद्धा.

दादांच्या विकासात्मक वृत्तीला भैय्यासाहेबांनी आपल्या कृतीशीलतेची जोड दिली. शिक्षण, तंत्रज्ञान, रोजगार, उद्योग आणि त्याची उपलब्धता कशी करता येईल यासाठी नेहमीच त्यांचा आग्रह असतो. सत्ता, पद असले काय किंवा नसले काय जनसामान्यांच्या मदतीसाठी कायमच उभे राहता येते, याच दादांच्या संस्काररूपी वृत्तीला साहेबांनी कृतीत उतरवून दाखविले. म्हणून आजही त्यांच्या भोवती कार्यकर्ते, जनसामान्यांचा गराडा कायम पहायला मिळतो.

विकासाच्या संकल्पनाची स्वतः आखणी करून शासन दरबारी तिला मंजुरी, ते प्रत्यक्षात ती आमलात आणण्यापर्यंतचा कृती आराखडा तयार करणारं सध्यातरी जिल्ह्यातल्या राजकीय क्षेत्रात आघाडीवर असणारं नाव म्हणजे अमरसिंह पंडित होय. शेती, पाणी, सिंचन यावर तर ते भरभरून बोलतातच पण करूनही दाखवतात. याची प्रचीती घ्यायची असेल तर सरत्या पावसाळ्यात तिंतरवणी ते लोणाळा व चकलांबा ते टाकरवण या हायवेवरून फक्त फेरफटका मारा, तलाव, पाझर तलाव तुडुंब भरलेली दिसतील. जी संख्येने गेवराई तालुक्यात कितीतरी पट अधिकची असतील हे श्रेय भैय्यासाहेबांचेच. फळपीक लागवडीस प्रोत्साहन, निम्नपातळी बंधाऱ्याची उभारणी, पीकविमा, इत्यादी मध्ये जाणीवपूर्वक लक्ष घालून सर्वसामान्यांना आधार आणि शासन दरबारी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न सातत्याने त्यांनी केला. प्रसंगी पैठणच्या नाथ सागराचे पाणी सुद्धा शेतकऱ्यांना हक्काने मिळवून देण्यात मुख्य भूमिका भैय्यासाहेबच घेतांना दिसतात. 'जल शारदा' प्रकल्पाच्या माध्यमातून तालुक्यातील नदी, नाले, ओढे पुनरूजीवीत करण्याचा त्यांचा प्रयत्न विकासाची जाण असणारा आणि भविष्यकाळाला सकारात्मक ऊर्जा प्रदान करणारा ठरतो.

विविध सहकारी संस्था, जय भवानी सहकारी साखर कारखाना या माध्यमातूनही त्यांनी तालुक्याच्या अर्थकारणाला गती मिळवून देण्यात मोलाची भर घातली आहे. 'शारदा प्रतिष्ठाण'ने सामाजिक पातळीवर गेवराईचे नाव महाराष्ट्रभर पोहचविले आहे. जवळपास दोन दशकापासून भैय्यासाहेबांच्या संकल्पनेने व नेतृत्वाखाली अविरत चालणारे आदर्श शिक्षक पुरस्कार आणि सामुहीक विवाह सोहळा यांनी तर जिल्हाभर प्रशंसा मिळवली आहे. असे हे राजकारणातले विविधांगी भैय्यासाहेबांचे नेतृत्व सामाजिक क्षेत्रात देखील आपली एक वेगळी नाममुद्रा उमटविण्यात यशस्वी झाले आहे.

पंचायत समिती सभापती, डीसीसी बँक अध्यक्ष, जिल्हा परिषद विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानपरिषद असा त्यांचा राजकीय प्रवास त्यांनी




कर्तृत्वाने सिद्ध केला आहे. मराठवाडा, दुष्काळ, बोंडआळी, विद्यार्थी शिष्यवृत्ती, वैद्यकीय प्रवेशाचे विभागनिहाय आरक्षण, अशा कितीतरी प्रश्नांवर विधीमंडळात सरकार कोणतेही असो धारेवर धरण्याची खुबी दाखवली ती भैय्यासाहेब यांनीच. निराधारांच्या समस्या, महाराष्ट्रातील कोड असणाऱ्या व्यक्तींना सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार व कायदेशीर मार्ग दाखवून दिला तो भैय्यासाहेबांनीच हे सर्वश्रुत आहे.

शिक्षण क्षेत्रातही मा. भैय्यासाहेबांचे महत्त्वपुर्ण योगदान आहे. जय भवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष म्हणूनही ते काम करतात. आयटीआय., डी. एड., बी. एड., डी. फार्मसी., कृषी पदविका, नर्सिंग कोर्स, इत्यादीच्या माध्यमातून त्यांनी अनेक तरूण-तरूणींना जीवनात स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम केलेले आहे. गेवराईच्या ग्रामीण भागात कला व विज्ञान महाविद्यालयांची उभारणी करून उच्च शिक्षणाचा स्त्रोत सर्वांसाठी खुला केला आहे. यामाध्यमातून अनेक तरूण वेगवेगळ्या ठीकाणी आपल्या कर्तृत्वाचा ठसा निर्माण करत आहेत. घराघरात हा ज्ञानाचा स्वयंप्रकाश पोहचत राहिला पाहिजे, हीच भैय्यासाहेबांची यामागची भूमिका. म्हणूनच विज्ञान, तंत्रज्ञान आणि मुल्यात्म शिक्षणाचा हा दृष्टिकोन ठेऊन संस्था वाटचाल करते आहे.

भैय्यासाहेबांचे सामाजिक योगदान डोळ्याआड करताच येऊ शकत नाही. महापुरात सर्व काही वाहून जात असताना कुटुंबप्रमुख म्हणून पहिली जबाबदारी घेतांना ते दिसतात. आवश्यक सामानाची वाटप करून टाळेबंदीला सामोरे जायचा धीर देतात. व्हेंटीलेटर, ऑक्सीमीटर व इतर साहीत्य पुरवून आरोग्य यंत्रणेला मजबुती देण्याचा प्रयत्न करतात. तर दुसरीकडे कोव्हीड सेंटरची उभारणी करून, ऑक्सीजनची व्यवस्था करून सर्वसामान्यांचे जीवनदाते म्हणूनही पुढे येतात. आजच्या विपरीत आणि भयावह परिस्थितीत देखील सर्वसामान्यांना आधार आणि मानसिक बळ देण्यासाठी भैय्यासाहेब सतत जिल्हाभर फिरतांना दिसतात. लोकप्रतिनिधीने सर्वसामान्यांसाठी काय केले पाहिजे. हा विचार जेव्हा केव्हा केला जातो तेव्हा महाराष्ट्रात भैय्यासाहेब मा. आ. आमरसिंह पंडित यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. या काळात तर हे अणखीच मोलाचे योगदान ठरणार आहे. माणसाच्या अस्तित्वाची ही लढाई जिंकायची असेल तर अशाच कर्त्या माणसांच्या पुढाकारातून तिला बळ येऊ शकते.


राजकीय भूमिका मग ती कोणतीही असो एकदा घेतली की, त्याच भूमिकेतून त्यांची एकनिष्ठता प्रतीत झाल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच त्यांचा सुजाण राजकारणी हा उल्लेख महत्त्वाचा ठरणारा आहे.

मातीचा कसदारपणा त्यांनी बाणेदारपणाने जपला म्हणूनच त्यांच्या स्वभावात ताठरपणा येत गेला. यातूनच त्यांचे वेगळेपण सिद्ध होते. याच ताठरतेची भाषा आपुलकी, विश्वास प्रतीत करत असते, केवळ आभास निर्माण न करता, किंवा नुसता आव न आणताही, जे काही आहे ते स्वीकारण्याची जाणीव करून देत असते. कारण त्यांच्या ह्या ताठरपणाला सत्य आणि वास्तवाची पार्श्वभूमी असते. पण काही कुटीलांनी याच ताठरतेला रंग देऊन जनमतापासून भैय्यासाहेबांना दुर ठेवण्याचा प्रयत्न केला. आणि तो यशस्वी झाला हे गेवराई करांचे पर्यायाने जिल्ह्याचे दुर्दैव म्हणावे लागेल.

असा नेता आणि नेतृत्व गेवराई सारख्या संपन्न व समृद्ध मातीच्या सहवासाने विस्तारले आणि बहरलेसुद्धा. अनेकांच्या जनसामान्याच्या अडीअडचणीसाठी, महत्वकांक्षी प्रकल्पासाठी प्रसंगी आपले राजकीय वर्चस्व देखील पणाला लावले. असे मराठवाड्यातील हे एक अवलिया व्यक्तीमत्व, आमचे आधारस्तभ मा. अमरसिंह शिवाजीराव पंडित यांना जन्मदिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा ! ..

**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे**
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी. संपर्क - ८२०८६९४०३७

# श्वासाची दमछाक अन् व्यवस्थेची हतबलता.....



प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर,गढी.
संपर्क - ८२०८६९४०३७

जो तो आपल्या श्वासाच्या गतीचा तोल सावरण्याच्या अटोकाट प्रयत्नात आहे. जीवघेण्या धकाधकीत कशी तग धरावी प्रत्येकाने, हाच प्रश्न घोंगावतोय अवती भोवती. जिकडे तिकडे बचावासाठीची नुसती धावपळ झालेली तुम्ही आम्ही अनुभवली आहे. आजही अनेक पातळ्यावरची ही ओढाताण तशीच चालू आहे. दवाखाने, मेडीकल, कोव्हीड सेंटर, कोव्हीड हॉस्पिटल, व्हेंटीलेटर आणि रेमडेसिव्हर अशा साऱ्या भोवती आम्ही भ्रामकपणे, जीवाच्या अकांताने धावतो आहोत. हे केल्यास असे होईल, हे न केल्यास अस असं होणार नाही, असे फक्त आणि फक्त प्रयोग चालू आहेत. गेल्या १५-१६ महिन्यापासून ही भितीची जरब डोक्यात घर करून, अन् छातीत धडधडत आहे. एकानंतर दुसरी, दुसरीनंतर तिसरी अशा लाटाच लाटा घोंगावतायत सध्या जगभर. भास आभासावर चाललेय नुसतेच अनिश्चित जगणे. पण ही दमछाक आता गुदमरून टाकू लागलीय आतल्या आत.

आला सास, गेला सास
जीवा तुझं रे तंतर
अरे जगनं-मरनं
एका सासाचं अंतर

असं जे बहिणाबाई अनुभव, निरीक्षणातून म्हणाल्या त्या जगण्याच्या वाटेला अन् श्वासाच्या अंतराला मोजता मोजता तंत्रज्ञानाचा व विज्ञानाचा कस या काळात लागू लागला.

जीआर, शासन निर्णय, शासन आदेश व प्रशासकीय परीप्रत्रकांची सर्वाधिक रेलचेल याच काळात तुम्ही आम्ही वाचली आणि पाळलीसुद्धा. तरीही परिस्थिती आवाक्यात, नियंत्रणात पाहिजे होती तशी राहिलीच नाही. आयसीएमआर (खउचठ), जागतिक आरोग्य संघटना (थकज) यांनीही वेळोवेळी माहिती पुरवली तसेच मार्गदर्शक सूचनाही जारी केल्या. पण जे व्हायला नको तेच हळूहळू घडत गेले आणि या भयावह परिस्थितीला सामोरे जायची आपल्यावर वेळ आली. टप्प्याटप्प्याने गावंच्या गावं कोरोनाच्या सावटाखाली यायला लागली. हे जसजसे विक्राळ रूप धारण करू लागले, तसतसे सगळे काही असताना आम्ही व्यवस्थेच्या पातळीवर उघडे पडायला लागलो. पण तरीही आरोग्य सेवा देणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे तुर्तास तरी आभार मानावे तेवढे कमीच आहेत.

एक देश म्हणून मागे वळून पाहिले तर आपल्याकडे बरेच काही आहे, काहीच नाही असेही नाही. पण जसे असायला पाहिजे होते तसे मात्र निश्चितच नाही. जवळपास एकाच वेळी जगातली सर्वात बलाढ्य लोकशाहीची प्रक्रिया आपण पुर्ण करू शकतो, अनेक मोहिमा शासन, प्रशासन स्तरावरून जनस्तरांपर्यंत अगदी सहजरित्या पोहचविण्याची प्रक्रिया पार पडते. पत्रकारीता तर जोमाने बोलत, लिहित राहते तत्परतेने हरएका विषयावर. समाजमाध्यमे तर किती प्रभावीपणे हाताळली जातायत आपल्याकडून. कागदावरचे अडाखे, अंदाज आणि आराखडे असे परफेक्ट उतरतात नियोजनावर. एवढी सार्वजनिकता व्यापक पातळीवरची असतानांही ती तशी चालवण्यात आपल्याकडून हयगय होते आहे. याला अनेक कांगोरे आहेत. ते तपासण्याची वेळ मात्र या कोरोनामुळे आलीच आली आहे. हे सगळ्या, सगळ्याच घटकाने आत्तातरी मान्य करावेच करावे. ऐवढे मनुष्य बळ आपल्याकडे उपलब्ध आहे. देशाचा प्रत्येक कोपरा अन् घटक शासकीय दृष्टिक्षेपात असतो. सर्वसमावेशक विकासासाठीचे अजेंडे हातात आणि तोंडात सदोदीत असतात आपणा सर्वांच्या. पण काय होते कुणास ठाऊक आयोजन, उपाययोजना या बाबातीत कुचकामी ठरत जातो. त्याचा परिणाम ना माणसावर होतो ना व्यवस्थेवर.

या काळात जवळपास सर्वच बाजूने घेरल्या गेलो आपण, पण प्रामुख्याने सर्वाधिक प्रभावित झाल्या त्या दोन यंत्रणा, एक शिक्षण आणि दुसरी आरोग्य. ज्या काही वर्षापूर्वी संबंध खछअख सोबतच ग्रामीण भारतालाही अधिक जोरकसपणे सक्षमीकरणात मोलाची भर घालताना दिसत होत्या. पण खाजगीकरणात त्या वरचेवर तोकड्या पडत गेल्या. उलट जे काही आहे ते अधिक बळकट, विस्ताराने पुढे यायला पाहिजे होते, पण तसे काही झाले नाही. बालवाड्या, अंगणवाड्या, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा, जशा बंद पडल्या म्हणा किंवा धोरणात अडकल्या, अडकवल्या गेल्या. तशीच गत जिल्हा रूग्णालये, ग्रामीण रूग्णालये, आरोग्य केंद्र आणि आरोग्य उपकेंद्रांची झाली. मनुष्यबळ, औषधपुरवठा, उपचाराची साधने हे मोहिमेपुरतीच मर्यादित झाली, बाकी उपचार मात्र खाजगी हॉस्पिटलमध्ये उरले. कारण अर्थकारण पुढे पुढे सरकत गेले, मग सुरू होते बैठका, आढावा आणि घोषणांचे सत्र, जे ठरते तात्पुरते.

मुळात वर उल्लेख केलेल्या सार्वजनिक व्यवस्था जर प्रबळ असत्या तर शिक्षणाचा बाजार अन् ह्या कोरोनाच्या लाटा इतक्या विकोपाला गेल्याच नसत्या. आजही प्रशिक्षित शिक्षक आणि शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची उपलब्धता शाळेच्या परिसरात असतानांही त्या ओस पडताहेत. जे व्हायला नको आहे. तसेच त्या त्या आरोग्य केंद्राच्या परिक्षेत्रात क्षमतेपेक्षा जास्तीची रूग्ण संख्या झालेली आहे, असेही नाही, एरवीही ती ओस असतातच. उलट गावापासून जिल्ह्यापर्यंत असणारी सार्वजनिक रूग्णालये सक्षम असती तर चित्र वेगळे राहिले असते. आणि प्रत्येकाच्या वाट्याला आलेली कोंडी तिथच सुटली असती. पण खाजगीकरणाला, बाजाराला हे कदापी फायद्याचे ठरणार नाही. तेव्हा महामारीच्या काळात बेडची अनउपलब्धता, औषधांचा तुटवडा, ऑक्सीजनची कमतरता, इ. आणि ऐन शैक्षणिक वर्षाच्या आरंभीच छे वाळीळेप चा लागणारा बोर्ड खाली उतरवायचा असेल, हेच नाही तर, असे अनेक ऐन संधीत संधी निर्माण करणारे प्रश्न दूर करायचे असतील, हे हमखासचे चित्र बदलायचे असेल, आता कायम स्वरूपी आणि दूरगामी परिणाम करणाऱ्या दिर्घकालीन उपाययोजनांकडे आपल्याला वळावे लागेल. म्हणजे लेखाजोखा मांडताना पळापळ होणार नाही. ओढून ताणून जाहिरात बाजी करता येईल, थोपवता येईलही बळजबरीने जनमनावर, पण प्रगतीचा किंवा अवनतीचा चढता उतरता आलेख मात्र हवा तसा नाहीना रेखाटता येत. काही गोष्टी काळानुसार करण्यापेक्षा काळावर स्वार होऊन कराव्या लागतील आणि हे शासन प्रशासनाने कोरोनाच्या लाटांच्या वाटा न पाहता लवकरात करावेच करावे. आपल्या श्वासाची हीच दमाछाक एकूणच व्यवस्थेची हतबलता अधोरेखीत करती झाली आहे. मग तो श्वास आरोग्य व्यवस्थेचा असो, शैक्षणिक क्षेत्राचा असो, शासन प्रशासनाच्या धोरणाचा असो, राजकीय दृष्टेपणाचा असो, बाजाराचा असो वा माणसाचा. जो आज पुर्णतः कृत्रिम आणि तात्पुरता झाला आहे. म्हणूनच वाटते तुम्ही आम्ही याचे भान जरूर ठेवावे. बाकी स्वस्थ रहा, मस्त रहा, घरीच रहा...!

---

कार्यारंभ
Thursday 2021/10/14

# दसरा आणि मेळावे या निमित्ताने

*सणावारांभोवतीच आम्हा भारतीयांची जीवन पद्धती घुटमाळत आलेली आहे, विस्तारली, विकसित झालेली आहे. इथला ग्रामीण भाग याचे केंद्र आहे. इथल्या कष्ट आणि निष्ठावरच त्याचे भरण पोषण झालेले आहे. पण ते आता मागे पडून अंत्यत उत्साही लोकांनी हे केंद्र आणि सण हायजॅक केले आहेत. अवास्तव आणि झगमगाटाचा दिखावूपणा याकडे सर्वांचाच कल वाढत चाललेला हा काळ आहे. या आणि अशाच गोष्टींकडे सर्वाधिक आकर्षित होणारांची संख्या कैक पटीने वाढली. कारण त्याला अर्थकारणाचे गणित जोडले गेलेले आहे. आता तर हे सारे राजकीय, धार्मिक, सामाजिक, जातीय अशा वेगवेगळ्या रंगात रंगवणे जसे चालू आहे, तसेच वेगवेगळ्या भावनिक, मानसिक प्रकारात इथल्या समाजाला, इथल्या तरूणांना देखील गुंगवणे चालू आहे. असं एकूण सारं असतांना आमची उर्जा आणि पैसा हे दोन्हीं मात्र यात कायमच खर्ची पडत आले आहेत.*



आज अनेक राजकीय पक्षांचे दसरा मेळावे पार पडतायत. तसे पक्षी, प्राण्यांचेही असे काही मेळावे भरत असतीलच, पण ते माणूस म्हणून आपल्या संवेदनेत आजकाल उरले आहेत अस वाटत नाही. मात्र राजकीय म्हटले की आपली संवेदनशीलता प्रखर व्हायला लागते. हे ग्रहीत धरूनच वेगवेगळ्या पक्ष, संघटना, परिषदा, संस्था यांचेही असे मेळावे सध्या घेण्यात येऊ लागले आहेत. अशा मेळाव्याचे आयोजन करण्याची परंपराच गेल्या काही वर्षात त्यांनी निर्माण केली आहे. आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ती चांगलीच गाजतात. दसरा, विजयादशमी जवळपास सर्वांनाच माहित आहे. पण या दिवसाला भरणारे, जाणीवपुर्वक घेतले जाणारे मेळावे मात्र सर्वसामान्यांच्या आवडीचे, चर्चेचे होत आहेत. काही जण तर अशा मेळाव्यांची आतुरतेने वाट पहातात, तर काहींना दसरा म्हणजेच मेळावा, असं वाटायला लागले आहे. तर काही जण या मेळाव्यातूनच दसरा साजरा करतात. कुणाला तर मेळावा नाही म्हटलं की अवदांचा दसरा झालाच नाही असेही सारखे वाटून राहते. अशी ही दसरा मेळाव्याची नवी राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक रीत तयार होत आहे.

सत्याचा असत्यावर झालेला विजय, किंवा दहा प्रकारच्या विविधता असतानाही केवळ एका दुर्गुणामुळे पराभव आणि एकमेव पण उत्तम अशा सदुणाचा हा विजय आहे. म्हणूनच तो सगळीकडे आनंद देऊन, घेऊन व वाटून साजरा केला जातो. अविचाराचा रावण जाळून सद्‌आचरणाचा स्वीकार ही खरी भूमिका या सांस्कृतिक सोहळ्यामागची आहे. आणि चांगल्या वर्तनाचा संकल्प दिन म्हणूनही याची आजकाल नव्याने ओळख होऊ लागली आहे. मुळात या विजयादशमी साजरी करण्याचे मुळ हे कृषक परंपरेला लागून आहे. खरिप आणि रब्बीचा हा समन्वय काळ असायचा. विविध वनस्पती, पिके यांच्या विषयीचा ऋणभाव यातून व्यक्त होतो. धन धान्याच्या रूपाने येथून पुढचा काळ स्वर्णरूपी असणार हा यामागचा सकारात्मक आणि आशादायी उद्देश. तसेच बदलत्या ऋतूकाळाचा हा एक सांधाही आहे. पण काळ बदलला तसा हा सांधा आपआपल्या परीने सांधायचा एक नवा मार्ग तयार झाला. जसं इथल्या हर एक सणवाराला, उत्सवाला शेती मातीचा, कष्टाचा संदर्भ आहे, पण तो आता किती शिल्लक आहे वा लागू पडेल हा ही एक प्रश्नच आहे. कारण उत्साही असे आपण सर्वजण केवळ आणि केवळ निमित्त शोधण्यात दंग असतो. मग अशात या दसऱ्याचे निमित्त साधायला कसे काय मागे पुढे पाहणार? परिणामी भव्यदिव्य दसरा मेळाव्याचे आयोजन करून, हवे तसे आणि हव्या त्याच विचाराचे, पाहिजे अशा पुढच्या वाटचालीचे सोने वाटण्या, लुटण्याचा हा एक उपक्रम झाला आहे. अशातून काही चांगलेही हाती पडण्याची शक्यता असतेच, किंवा काहीच चांगले नाही असेही नाही.

महाराष्ट्रात अशाच दसरा मेळाव्यापैकी सर्वाधिक चर्चिले जाणारे दोन मेळावे आहेत.

एक आहे राजकीय पार्श्वभूमी असणारा मुंबईच्या छत्रपती शिवाजी पार्कचा, तर दुसरा आहे बीड जिल्ह्यातील सामाजिक, सांस्कृतिक भूमिका घेणारा. लोक या दोन्हीलाही भरभरून गर्दी करतात, आनंदाने बहोश होतात. जुन्या आराखड्यात नव्याची समीकरणं शोधत एक नवी उर्जा घेऊन निघतात. यात असते त्यांची आस्था, श्रद्धा आणि निष्ठा. तरीही आज थैमान घातलेल्या कोरोना, लॉकडाऊन, अतिवृष्टी, पूर परिस्थिती व या विपरीत परिस्थितीतून आपण लवकरच बाहेर पडू. आणि पुन्हा आपले आयुष्य, जीवनमान पुर्वपदावर येईल अशा मनोकामना करून, आजपर्यंत ज्या संयम, धीराने या सगळ्यांना आपण तोंड दिले आहे, हे स्मरून तुर्तास त्याचाच हा विजय आहे हे ठामपणे सांगून भविष्यात मात्र या सर्वांवर विजयोत्सव साजरा करू हे नक्की.

**- प्रा.रमेश बाबासाहेब रिंगणे**
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी.
संपर्क - ८२०८६९४०३७

# सुख म्हणजे नक्की काय असतं?

■ सकारात्मकतेचं बीज



■ प्रा. रमेश रिंगणे

*प्रवासात आपण नेहमी जवळ असणाऱ्या गोष्टींना पाठीमागे सोडतो अन् दूरवरच्या गोष्टी सोबत घेऊन चालत असतो. सुखप्राप्तीच्या क्षमता आणि अवास्तव अपेक्षा यातल्या अंतराची दरीही तशीच वरचेवर रुंदावत चालली आहे. या गोष्टींचा आपण विचार करणार नाहीत तोवर सुख म्हणजे नक्की काय, हे कसं कळणार?*

**मला सांगा सुख म्हणजे**
**नक्की काय असतं?**
**काय पुण्य असलं की**
**ते घरबसल्या मिळतं?**

माणूस एवढे उपद्व्याप, किती आणि केवढे मनस्ताप सहन करत चालतो या सुखापायी. ज्या गतीनं सुखाकडे जावं वाटतं त्याच वेगाने ते हातावेगळे होते. प्रवासात आपण नेहमी जवळ असणाऱ्या गोष्टींना पाठीमागे सोडतो अन् दूरवरच्या गोष्टी सोबत घेऊन चालतो. तशीच सुखप्राप्तीच्या क्षमता आणि अवास्तव अपेक्षा यातल्या अंतराची तफावत वरचेवर रुंदावतच चाललीय. जोवर याचा आपण विचार करणार नाहीत तोवर सुख म्हणजे काय हे नक्की कसं कळणार?

मानणे, जाणणे आणि असणे या सगळ्यांवर आपला अंकुश राहिला नाही म्हणून तर दुसऱ्यांकडे, दुसऱ्यांच्या हाताकडे बघण्याची वृत्ती वाढत चाललीय. सध्या तर स्वतःच्या दुःखाचा इतका वैचारिक गोंधळ उडालेला आहे की, अपसूकच सुख, आनंद, समाधान या गोष्टी आपल्यासाठी पोरक्या होऊन बसल्या आहेत. सुख, दुःख या एकमेकास पूरक असणाऱ्या दोन गोष्टी माणसाच्या जीवनात नितांत चालणाऱ्या आहेत. मात्र पूरक असणाऱ्या सुखदुःखाशी माणूस आज तुटक वागतोय. यांच्यात पूर्वीपेक्षा जास्तीचे अंतर आता जाणवायला लागलेय. नात्यातील आपुलकी, प्रेम, जिव्हाळा या असल्याचा आता आपल्यावर काही फरक पडत नाही. या सर्वांनाच वर्तनाच्या कृत्रिम साच्यातून पडताळलं जातंय. सोयीनुसार आपल्याला सगळं हवंय, सुखाची स्वप्ने, विचार असावे आणि ते मिळवण्याचे प्रयत्नही असले पाहिजेत. पण आज तरी नुसता वृत्तीला हव्यास वाढतोय. खाडाखोड केल्याने सुंदर अक्षरातली स्पष्टता आणि नेमकेपणा हरवून जातो तसंच जगण्याच्या गणिताचे झालेय. तोडमोड व ओरबाडण्याच्या नादात आपल्यातल्या आपुलकीचा, प्रेमाचा, आपलेपणाचा नाजूक धागा झुरत चाललाय. आपल्या जगण्याला परिस्थितीच्या संदर्भाचे भान राहिले नाही. सुखासाठी, समाधानासाठी धडपड करण्यात काही गैर आहे असं नाही. परंतु स्वतःच्या परिस्थितीचा किंवा कुवतीचा आवाका आपण कधी लक्षात घेणार? अतिरिक्त अपेक्षा, अव्यवहार्यता, अवास्तवता आपल्या मानगुटीवर बसलीय.



**तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा**
**अनुभव सरिसा, मुखा आला**
**आनंदाचे डोही आनंदतरंग**
**आनंदचि अंग आनंदाचे!**

ही अवस्था होती संत तुकारामांची. म्हणूनच त्यांना आनंद हेच आनंदाचे उगमस्थान आहे असे म्हणावे वाटले. आजचे चित्र उलटे आहे. दुसऱ्याच्या दुःखात स्वतःच्या सुखाचा शोध घेणारी मानसिकता निर्माण झाली आहे त्यामुळे समाधान असे कशातच उरले नाही. मी कोणाच्या पुढे असलो काय आणि मागे पडलो काय, याने कुणालाच असा काही खास फरक पडणार नाही हे खरे. पण या दोन्हीही अवस्थेत जर मीच अस्वस्थ होत असेल तर आता निश्चितच थांबले पाहिजे. पुढे जाणाऱ्याकडून अनुभव घेतले पाहिजेत आणि मागच्याकडून कारणं शोधून वर्तनाचा वर्तमानाशी मेळ घातला पाहिजे. हे करत असताना समाधानाची चावी तत्त्वाला, आचाराला, विचाराला वा मानण्याला लावावी लागणार आहे.

जीवनाला प्रवाही करावं लागतं, रोजच्या समस्यांच्या मुळाशी जावं लागतं. एखादी गोष्ट वारंवार समोर आव्हान म्हणून उभी राहत असेल तर ती घटना नाही, त्यातले वर्तन तपासावे लागते. मगच सुख-दुःखाची क्रॉसलाइन ओळखता येईल आणि आयुष्याची लाइफलाइन हवी तशी ओढता येईल.

■ संपर्क : ८२०८६९१४०३७

# आजच्या बळीला राज्य नको, चांगले दिवस हवेत....

आमचा भारत कृषिप्रधान देश आहे. आणि या भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रमुख कणा ही शेती आहे. याच शेतीभोवती व्यापार, व्यवहार, बाजार, अर्थकारण आणि राजकारण फिरताना दिसते. भारतातील ७५ टक्के लोकांचे जीवन शेती आणि शेतीशी समांतर चालणाऱ्या व्यवहारीक अर्थशास्त्रावरच अवलंबून आहे. जगातील अन्नधान्यांची उपलब्धता, पूर्तता करण्यात भारताच्या कृषिप्रधानतेचा, शेती उत्पादनांचाही उल्लेखनीय वाटा आहे. इथली संस्कृती ही मुळातच कृषिनिष्ठ आहे. इथला आचार, विचार, विहार आणि आहारसुध्दा या मातीच्या मूलतत्त्वावर पोसलेला आहे. म्हणूनच आपल्या जाणिवा, नेणिवा आणि संवेदने मध्येसुद्धा हा संस्कार विकसित होत गेला आहे. अशा प्रकारे भारतीयांची जीवनशैली ह्या शेती भोवतीच विकसित होत आलेली आहे. ती [illegible] कृषी परंपरा नसून संबंध भारत वासीयांची जीवनधारा झालेली आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही.

[illegible]



[illegible]




प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी.

[illegible]

कार्यारंभ
Monday 2022/04/11



# सुधारणावादी साहित्याचे प्रेरणास्त्रोत : म. जोतिबा फुले



**एकोणिसाव्या शतकामध्ये जगभर जे सुधारणावादाचे वारे वाहू लागले, त्याचे पडसाद भारतातही उमटू लागले होते. पण इंग्रज राजवटीला हा सुधारणावाद अनुकूल आणि दिर्घकाळ सहाय्यकारी ठरेल असाच अपेक्षित होता. परंपरागत आणि धार्मिकतेला अनुसरून होणाऱ्या या प्रक्रियेत सुधारणांचा केवळ दिखावा करणे, आणि स्वहेतू साध्यतेसाठी सांस्कृतिक वातावरण तयार करणे, अशा संकुचित स्वरूपाचे ते होते. आणि याच प्रतिकूल परिस्थितीत महात्मा जोतिबा फुल्यांचे सामाजिक, शैक्षणिक, वैचारिक, साहित्यिक क्षेत्रातील सुधारणाविषयक विचार तत्वांचे योजन आणि आचाराचे योगदान मोलाचे ठरले.**

महात्मा जोतिबा फुले म्हणजे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रबोधन पर्वाची एक अत्यंत महत्त्वाची कडी. ज्यामुळे पुरोगामी महाराष्ट्र म्हणून जो वैचारिक वसा, वारसा आणि ओळख निर्माण झाली, त्याचा मध्य महात्मा जोतिराव फुले यांनी साधला आहे. जो विचार आणि कार्याच्या एकतत्वावर ठामपणे उभा आहे. सुधारणेच्या काळातील हे असे एक वादळ आहे, जे दलित, शोषित, शेतकरी, स्त्री, शुद्रादिशुद्र यांच्या उत्थानासाठी सतत प्रस्थापितांवर आदळत राहिले. शासन व्यवस्था, सामाजिक व्यवस्था ह्या आघाड्यांवर समाज हितासाठी सदैव प्रयत्नशील असणाऱ्या विविध चळवळी आणि विचारकार्याची मध्यवर्ती संकल्पना ही फुले यांच्या कर्तृत्वातून आणि विचारानेच दृढमुल झालेली आहे. म.फुल्यांच्या तर्कशुद्ध, विज्ञाननिष्ठ व मानवतावादी दृष्टिकोणातून ती समाजहित व परिवर्तनासाठी झटतांना दिसते. पुर्वापार चालत आलेल्या रूढी, परंपरानी विविध समाज घटकांची पिढ्यान पिढ्या केलेली कोंडी महाराष्ट्रात, भारतात पहिल्यांदा फोडली ती म. फुले यांनीच. तेच खऱ्या अर्थाने आधुनिकतेचे जनक ठरतात. पण पश्चिमेकडील हे आधुनिक विचारांचे वारे आपण आपल्या सोयीनुरूप, व्यवस्थेला अनुसरून स्वीकारण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न केला. काही ठराविक वर्गाच्या हितसंबंधाची मेख त्यात येऊ लागली, हे ओळखून जोतिबा फुले यांनी शोषिक-शोषित संघर्ष उभा केला. आणि हे सार्वजनिक हित साधताना त्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या संकटांना सामारे जावे लागले. ही वैचारिक, प्रबोधनात्मक, ज्ञानात्मक लढाई म्हणजेच महात्मा जोतिबा गोविंदराव फुले. मराठी साहित्यातही फुले यांच्या कृतीचा रोखठोकपणा आणि वैचारिक प्रग्लभता प्रखरतेने दिसते. मानवाचा धर्म एकच आहे असं म्हणणारे म. फुले, 'भेदाभेद भ्रम अमंगळ' सांगणाऱ्या संत तुकारामाशी 'अखंड' रचून जन कळवळ्याचे आणि कल्याणाचे थेट नाते दर्शवतात. पांखडतेवर, काल्पनिकतेवर हल्ला चढवून 'जोती म्हणे' म्हणत जीवनमूल्यांचा ध्यास धरतात. शेतकऱ्याची आज ही जी केविलवाणी अवस्था आहे, ज्यांच्या हातातही नाही आणि पदरातही नाही अशी सततची जी गत आहे. तेव्हापासून ती तशीच आहे. म्हणून सरकारी धोरणांची वस्तूनिष्ठ शहानिशा करून निर्णयशाही वर म.फुले यांनी उगारलेला 'शेतकऱ्याचा आसूड' आजही हाती असणे खरे गरजेचे ठरणारे आहे. पण हे होताना दिसत नाही. कारण जोतिबा शेतीला उद्योगशील करण्यासाठी झटले. आणि आपण शासकीय अनुदानास पात्र होण्यासाठी धडपडतोय. कुणब्यांचे शोषण करणारी व्यवस्था कसे जीवनावर विपरीत परिणाम करते हेही त्यांनी 'तृतीयरत्न' या नाटकातून दाखवून दिले आहे.

वर्ण व्यवस्थेने कायमच जाणिवपूर्वक कर्माचा वा कर्तृत्वाचा तिढा सोडवलाच नाही. जन्माधारीत श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व सिद्ध करण्यासाठी हेतूपुरूस्कृत कपोलकल्पित कथा, दंतकथा, शास्त्रे, संहिता तयार केल्या गेल्या. आणि ह्याच अवडंबरातून आमच्या वाट्याला आलेली नाही, तर लादलेल्या 'गुलामगिरी' चा इतिहास बुद्धीवादी दृष्टिकोणातून म. फुलेंनी विशद केला. हीच दिशादर्शक वृत्ती पुढे सत्य इतिहास लेखनाला प्रेरणादायी ठरली. जात, धर्म ही माणसाच्या हितासाठी, भल्यासाठी असायला पाहिजेत, पण तसं न होता त्या आधारे शोषण करणारी व्यवस्था बळकट होत असेल तर याची नव्याने मांडणी करायला लागते. हे तर सांगतो फुल्यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म'. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मानवी मुल्यांच्या आचरधर्माचे हे 'पुस्तक' आहे. आ. ह. साळुंखे यालाच मानवाधिष्ठित धर्म म्हणतात. वेगवेगळ्या धर्माच्या मर्यादा ओळखून, समानतेच्या तत्त्वावर शोषणमुक्त समाज निर्माण करणारा असा सार्वकालिक धर्म त्यांनी प्रतिपादन केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधी स्थळाचा जसा म. फुले यांनी शोध लावला, तसाच त्यांच्या बाबतीतला योग्य इतिहासाचा बोधही घ्यायला लावला. 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' रचून सांस्कृतिक संघर्षात दुरावलेले शिवाजी महाराजांचे राष्ट्रपुरूषत्व व वास्तविक नामाभिधान 'कुळवाडीभुषण' असे जे रूढ केले ते फुल्यांनीच.



✍ प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे,
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी
संपर्क ८२०८६९४०३७

या बरोबरच सत्सार १ व २, इशारा, ब्राह्मणांचे कसब आदि साहित्य लेखनातूनही प्रकर्षाने समोर येतो तो सुधारणावादच. हाच प्रेरणास्त्रोत वैचारिक आणि साहित्याच्या क्षेत्रात देखील जोरकसपणे पुढे आला. म्हणूनच पुरोगामीत्वाचा जो आपण हुंकार भरतो तो 'फुले शाहू आंबेडकर' असाच.

मानवतावादी दृष्टिकोन प्रवर्धित करणारे जोतिबा हे खऱ्या अर्थाने महात्मा होत. तर्क आणि वास्तवाच्या भोवतीच त्यांची कृती फिरली म्हणून तर त्यांचे 'विद्येविना मती गेली' हे सारसुत्र महत्वाचे ठरते. आधुनिक मूल्यांचे जे बीजारोपण जोतीरावांनी आधुनिक भारतात केले. त्याप्रती एकविसाव्या शतकातही सजग राहणे समाज स्वास्थ्यासाठी मोलाचे ठरणार आहे. आणि म्हणूनच म. फुले यांची तर्कनिष्ठता, विज्ञाननिष्ठा समाजात रूजवण्याची आज खरी गरज वाटते. त्यांचा चिकित्सक व बुद्धीवादी दृष्टिकोण प्रत्येकाच्या व्यवहारात दिसून यावा, आणि हाच सुधारणावादाचा प्रेरणास्त्रोत

*'लाख बोलक्याहून थोर । एकचि माझा कर्तबगार ।'*

असा तुकडोजींच्या शब्दाशब्दातल्या क्रांतीतत्वाने कायम तेवत रहावा. हीच त्यांच्या जयंती दिनी अपेक्षा.




# चंपावतीपत्र

मा.श्री.शिवाजीराव (दादा) पंडित वाढदिवस विशेष

epepar.champavateepatra.in | champvatee@gmail.com | बीड-(महाराष्ट्र) | वार- रविवार दि.०९-१०-२०२२


# लोकहित हीच दादांच्या राजकारणाची प्रेरणा...

*बीड जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात भिष्माचार्य म्हणून ज्यांना ओळखले जाते, जनसामान्यांच्या आर्थिक संपन्नतेचा ध्यास घेणारे गेवराई तालुक्यातील विकासपुरूष, शिक्षणाचे ज्ञानक्षेत्र संबंध तालुक्यात उभारणारे शिक्षणमहर्षी, सहकाराचे जाळे विणून ग्रामीण भागासाठी समृद्धीच्या पाऊलवाटा खुल्या करण्यात पुढाकार घेणारे नेतृत्व, सामाजिक पातळीवर सर्वसामान्यांना नेहमीच आधार वाटणारे ऐकमेव आदरार्थी नाव, ज्यांनी विविध प्रसंगात घेतलेल्या सकारात्मक आणि लोकहिताच्या अनेक भूमिका जिल्ह्यासह महाराष्ट्रभर चर्चिल्या गेल्या. कायम सत्याचा स्वीकार केल्याने जे होऊ शकतं त्यालाच दादांनी होकार दिला.*


म्हणून त्यांच्या वर्तनात परखडता आली. आशा वेगवेगळ्या भूमिकेतून त्यांच्या स्वभावात नैसर्गिकपणेच कणखरता व खंबीरता आलेली आहे. ती आजही कायम आहे, असे मा. श्री. शिवाजीराव दादा पंडित यांनी वयाची ८५ वर्षे पुर्ण केली आहेत. त्यानिमित्ताने त्यांना जन्मदिनाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

राजकारणाला सामुदायिक करत करतच पुढे जायला पाहिजे, असं मानणाऱ्या पैकी एक आहेत दादा. सर्वांना सोबत घेऊन नव्या नव्या संकल्पना, विकासाच्या विविधांगी योजना प्रत्यक्षात आणता येतात यावर नितांत विश्वास ठेवून वाटचाल करणारे दादा. माऊलींच्या सत्कार्याची प्रेरणा आणि नगद नारायणाची प्रचंड श्रद्धा आजही त्यांच्या चालण्या बोलण्यातून जाणवत राहते. हीच प्रेरणा आणि श्रद्धा दादांनी राजकारणात, समाजकारणात देखील निष्ठेने सांभाळली. गोरगरीब, दिनदुबळ्या पर्यंत विकासाचा, सुधारणेचा वाटा जोपर्यंत जात नाही तोपर्यंत आपल्या भूमिका आणि तत्वाशी एकनिष्ठ राहण्यालाच त्यांनी प्रमाण मानले. बऱ्याचदा राजकीय कारकीर्द पणाला लागणारे निर्णय दादांनी लोकहितासाठी खंबीरपणे घेतलेले आहेत. लोकहित हीच दादांच्या राजकारणाची प्रेरणा आहे. यामुळेच गेवराई तालुक्यातील तत्कालीन राजकारणातील मंडळींनी दादांना एकमुखी साथ दिलेली आहे. आणि या सर्व जनसामान्यांच्या पाठबळावरच पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, विधानसभा सदस्य व राज्यमंत्री पदापर्यंतचा पल्ला त्यांनी पुर्ण केला आहे.

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद ह्या स्थानिक स्वराज्य संस्था, बाजार समिती आणि सहकार यातून जे काही सर्वांसाठी करता येईल ते करण्याचा सतत प्रयत्न दादांनी केला. आणि हे करता आले, याचे सर्व श्रेय ते गेवराई तालुक्यातील जनतेलाच देतात. त्याकाळात अनेक सहकाऱ्यांनी याकामी एकत्र येऊन बहुमोल सहकार्य केले, त्या सर्व संवगड्यांची दादा आस्थेवाईकपणे चौकशी करतात. हीच जनशक्ती दादांना महाराष्ट्राच्या राजकारणात आपला ठसा उमटवायला प्रेरित करती झाली आहे. आणि हाच वसा भैय्यासाहेब सध्या खंबीरपणे आणि अत्यंत जबाबदारीने पेलतांना दिसतात.

त्यांची शेती-माती विषयीची ओढ सर्वांच्या परिचयाची आहे. रानाशी त्यांचे एक प्रकारे भावनिक नाते आहे. आजही हे नाते अगदी मनापासुन जपतांना ते दिसतात. आजच्या विपरीत परिस्थितीत देखील हा गोतावळा त्यांना जिव्हाळ्याचा वाटतो. या जिव्हाळ्यातून आलेली धन्यता, कृतज्ञता ते आपल्या खुमासदार शैलीतून प्रतीत करत राहतात. सतत शेतातील विविध प्रयोगा बरोबरच, सेंद्रिय शेतीचा त्यांचा आग्रह कायम आहे. मातीशी घट्ट नाळ जोडलेली आहे दादांची. तसेच कुटुंब म्हणून जेव्हा अनेक राजकीय घराण्यांचा विचार केला जातो, तेव्हा दादांच्या तत्वांची व विचाराची घडी आजही भक्कमपणे उभी असल्याचे दिसेल. आपली कर्तव्ये आणि जबाबदारी एखादा माणूस किती निष्ठापूर्वक पार पाडू शकतो याचे हे एकमेव उदाहरण.

जिद्द आणि मनगटाच्या जोरावर दादांचा अत्यंत विश्वास आहे. एक खेळाडू म्हणून हा विश्वास ते आणखीही जोपासतात. शालेय, महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावर त्यांनी खेळाडू म्हणून दबदबा निर्माण केला होता. आजही बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचा भार दादांच्याच खांद्यावर आहे. त्यांच्याच मार्गदर्शनात आज गेवराई येथील 'कबड्डी कॅडमी' महाराष्ट्रातल्या अनेक खेळाडूंच्या स्पिरीटला चालना देण्याचे काम करते आहे. कबड्डी हा मातीतला खेळ आहे. ज्याच्यासाठी लागते निर्भिडता, बेडरपणा. कधीकधी नव्हे कायम जीवावार बेतणारा हा मराठी बाणा, असंही या कबड्डीला म्हणतात. पण अगदी स्वभाविक प्रवृत्तीनुसार दादांनी हा खेळ इथल्या मातीत फुलवला. बीड जिल्ह्यात या खेळाला जी खुप मोठी परंपरा आहे, जो इतिहास आहे. त्यात आदरणीय श्री. शिवाजीराव दादांचे मोलाचे योगदान आहे. महासांगवी, चऱ्हाटा, ढेकणमोहा, कुसळंब, आणि आता गेवराई, बीड येथे या खेळाला अतिशय निष्ठेने खेळले जाते, जपले जाते. याच खिलाडू वृत्ती आणि खेळाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील अनेक तरूणांना आपल्या स्वप्नांची व ध्येयाची वाट श्री. शिवाजीराव दादा पंडित यांनी दाखविली आहे.




**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे**

कला व विज्ञान महाविद्यालय,

शिवाजीनगर,गढी.

संपर्क- ८२०८६९४०३७


सार्वजनिक हिताची भूमिका घेताना स्वतःची महत्त्वकांक्षा दादांनी बाजूस ठेवली. हे राजकारणात सहसा कधीच घडत नाही. पण दादांनी हे करून दाखवले ते श्री. सुंदरराव सोळंके साहेबांना गेवराई मधून बिनविरोध विजयी करून. तेव्हाच 'जय भवानी'ची मुहूर्तमेढ रोवली गेली. गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ऊस पिकाला खात्रीशीर हमी मिळाली. अनेकांना रोजगार, स्थानिकांना व्यवसायाची चालनाही यातूनच मिळाली, शिकण्यासाठीचा आटापीटा थांबला अन् ग्रामीण भागाकडे समृद्ध जीवनाचा, जीवनशैलीचा प्रवास सुरु झाला. यात कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. पण याचा विचार करण्यापेक्षा, रोखठोक वृत्तीभोवतीच त्यांच्या प्रतिमेला, विचाराला मर्यादित समजून आपण आपली मते तयार करून घेतली. अन् याभोवतीच त्यांच्या विकासकार्याला नजरेआड करण्याचा प्रयत्न देखील झाला. याची कायम सल वाटून राहते.

शिक्षण, संस्कार, खेळ आणि सहकार या गोष्टी श्री. शिवाजीराव दादांनी जाणिवपूर्वक महत्वाच्या मानल्या. व्यक्ती आणि समाजाचा विकास साधायचा असेल तर या सर्व संस्था निर्माण करणे गरजेचे आहे हे ओळखून दादांनी जिल्ह्यासह, तालुक्यात ह्या संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला. आणि त्या सर्वांना, सर्वसामान्यांना अगदी सहज उपलब्ध होतील, मदतीला येतील याची खबरदारी देखील घेतली. आजही दादांनी स्थापन केलेल्या जय भवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ, जय भवानी सहकारी साखर कारखाना ह्या गेवराईच्या जनसेवेची, शैक्षणिक, आर्थिक विकासाची अखंड जबाबदारी वाहताना दिसतात. आज गढीच्या नवोदय विद्यालयातून जिल्हाभरातील शहरी, ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी यशस्वी होतात. तेव्हा दादांनी घेतलेला नवोदय विद्यालयाचा अट्टाहास, पुढाकार केवळ राजकीय होता असे नव्हे. कारण तो त्यांच्या दूरदृष्टीने घेतलेला भविष्यकालीन वेध होता. जो आज शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या आपणा सर्वांना हितावह ठरतो आहे. यातून सर्वसामान्यांच्या शिक्षणाविषयी दादांना असणारी आस्था व कळवळा प्रत्ययास आल्याशिवाय रहात नाही.

त्यांची भूमिका रोखठोक होती, पचायला जड जायची, पण ती वास्तव अन् सत्य असायची. हाच दादांचा करारी बाणा सर्वश्रूत आहे. सत्ता, पद असले काय किंवा नसले काय जनसामान्यांच्या मदतीसाठी कायमच उभे राहता येते, याच संस्काररूपी शिदोरीवर शिवछत्रची वाटचाल चालू आहे. हा संस्कार दादांनी आपल्या वृत्तीत नेहमी टिकवून ठेवला. आणि पुढे हस्तांतरीत करून रूजवलासुध्दा. त्याच संस्काराच्या मजबूत भिंतीवर उभा असलेले 'शिवछत्र' भैय्यासाहेब, जयभाऊ आणि विजयराजेंच्या कर्तृत्वावर सर्व सामान्यांच्या कायमच पाठीशी उभे असते. माती आणि माणसे जपली की मागे वळून पहायची गरज पडत नाही, हे त्यांनी वारंवार दाखवून दिले आहे. शिक्षण आणि समाजकारण साधताना राजकारण किती कौशल्याने करावे लागते याचा दादा एक वस्तूपाठ आहेत. जुन्या काळातील जाणत्या मंडळींनी दादांसोबत घेतलेले असे अनेक अनुभव, आजही त्यांचे सहकारी सांगतात, तेव्हा दादांच्या विचारांची आणि कर्तृत्वाची उंची लक्षात आल्याशिवाय रहात नाही.

# शिवशाही धोरणात रूजवावी लागेल

**छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आज विविध प्रकारे साजरी करण्यात येत आहे. वेगवेगळ्या दृष्टिकोनातून शिवशाही आणि शिवकाळ नव्याने समोर येऊ लागला आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या विचारांना, कार्याला, कर्तुत्वाला आणि त्यांनी निर्माण केलेल्या स्वराज्याला आपण सारे मानवंदना देऊ लागतो. त्याहीपेक्षा आज आपण इतिहासाची पाने पुन्हा चाळू लागलो, हे समाधानकारक चित्र आहे. पण याही पुढे आपल्याला जाता येईल ही शक्यता चिंतन, मनन, वाचनाने वास्तवात येऊ शकते. कारण छत्रपती शिवाजी महाराजांची प्रत्येक गोष्ट ही परमोच्चतेचा मानबिंदू ठरलेली आहे. त्यांच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि अशा कोणत्याही जबाबदारीमध्ये सर्वस्व अर्पिलेले असायचेच, सोबत लोकहीत हीच ठाम भूमिका त्यात असायची. याच आधाराने स्वराज्य सर्वहितेशी आणि नाविण्यपूर्ण ठरते. पण या ऐतिहासिक कर्तृत्वाला आम्ही आमच्या समोर असताना सोयीनुरूप योजन्याचा अट्टाहास केला. अन् कधीकधी जाणीवपूर्वक डोळेझाक देखील केली.**

आजची परिस्थिती पाहता छत्रपती शिवाजी महाराजांनी राबवलेल्या हर-एक लोकन्यायी धोरणाची प्रकर्षाने जाणीव होतांना दिसते. वाढती धर्मांधता मधल्या काळात आमच्या देशातील राजकीय धोरणांत ढवळाढवळ करतांना दिसते आहे. पण आता धर्मच नाही तर, आज प्रत्येक आघाड्यांवर जात प्रभावी ठरतांना दिसते आहे. आपण छोट्या छोट्या जातसमुहात विभागले जाऊ लागलो आहोत. तत्वाने, सत्वाने आणि जनकत्वाने आपण केवळ माणूस असलो तरी, आता माणसासारखे न राहता वेगवेगळ्या रंगाच्या मानवी वस्त्यांचे, राहुट्याचे रक्षक आणि भक्षक ठरत आहोत. हे करण्यासाठी सदैव मुठीत बळ एकवटून आणि डोळ्यांत आग रोखून आपल्याला गर्क ठेवण्याचा प्रयत्नही पराकोटीचा होताना दिसेल. मग आपणच जर असं वागू लागलो तर व्यवस्था कशी तग धरणार आहे. हाही विचार छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने आज करणे अगत्याचे ठरते. कारण शिवशाहीमध्ये राजकारण, धर्मकारण, प्रशासन आणि शासन यात निश्चित असं एक लोककल्याणकारी धोरण होते. त्या धोरणाच्या अमलबजावणीत वरच्या सर्व घटकांची सरमिसळ न करता काहीएक ठराविक अंतर जाणिवपूर्वक राखले जायचे. याच धोरणाची प्रत्येक वळणावर, प्रत्येक घडीला आज उणीव भासू लागल्याचे जाणवते आहे. ज्या काळात राजेशाही म्हणजे सर्व काही, अशावेळी देखील स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता ह्या मुल्यांचा स्वीकार करणारी शिवशाही निर्माण झाली. त्याच आधारे लोकशाहीची बीजे या भारतवर्षात पहिल्यांदा रूजायला सुरूवात झाली. राज्य हे जनतेसाठी, रयतेसाठी असते, राजासाठी यातलं काहीच असत नाही. मात्र त्याने हे सारे स्वकर्तृत्वाने चालवले पाहिजे. आणि कर्तृत्व हे अंगभूत संस्कारात, विचारात आणि आचारात सामावलेले असते, ते केवळ वारसाहक्कानेच मिळते असे नाही. हेच इतिहासाने शिवकाल व शिवशाहीच्या माध्यमातून अनुभवले.

जातीपेक्षा जिथं मातीची निष्ठा जपणारी माणसं होती, अराजकतेला एकतेच्या जोरावर भिडणारी निर्भीड छाती होती, विसंगतीला सुसंगत करणारी नाती गोती देखील होती, ध्येयामधील स्पष्टताही कुटुंबाच्या, नाते संबंधाच्या पल्याड झेपावलेली असायची, व्यक्तीपेक्षा, जाती-पातीपेक्षा कर्तबगारी नजरेनं हेरली जाऊन लायक मोहिमांची आखणी केली जायची. एकप्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला ही अशी जनआंदोलनाची गती होती, म्हणूनच मानवतावादी स्थितीला स्वराज्य पोहचले. पण आज हेच चक्र उलटे फिरतांना दिसू लागते. राजकारण आणि सत्ताकारणात शिवशाहीच्या या मुल्यांचा विसर घातक ठरणार आहे. याचे भान आपण कुठेतरी हरवत चाललो आहोत. न्याय भूमिका तर दूर-दूर कुठे दिसतही नाही. कार्यकारी, कायदा आणि न्याय मंडळात देखील सुसंगती व सुव्यवस्था असल्याचे मागच्या काही काळापासून जाणवत नाही. सहिष्णूता, निर्भया, दूरसंचारच्या अपत्तीरोधक निर्णयाला प्रशासन व्यवस्थेने दिलेली बगल यातून समस्त भारतीयांची विश्वासू निष्ठा जी न्यायव्यवस्था आहे, तीची हतबलताच अधोरेखीत होत आहे. CAA, NRC,NPR, आणि आत्ता आत्ताचे तीन कृषी कायदे इ. सारखे बहुमताच्या जोरावर घेतलेले सगळेच्या सगळे निर्णय लोकहिताचे असतीलच असंही नाही. आणि अशा निर्णयामधली वारंवारीता तपासली तर याची कारणे कळायला उशीर लागणार नाही. केवळ स्वतःच्या आग्रह आणि अत्यंतिक निग्रहाचे निर्णय लादले जावू नयेत, तसेच बहुमताच्या अतिरिक्त आग्रहापुढे लोकमत झुकवले जावू नये. हाही विचार आपल्याला शिवशाहीच्या दृष्टिकोनातून



पहावा लागेल. तेव्हाच लोकशाही प्रबळ आणि प्रग्लभ होत वाटचाल करेल.

शेती, पिके, तंत्रज्ञानही बदलले पण शेतकरी काही सुधारत नाही, याचाही लेखाजोखा शिवाजी महाराजांच्या धोरणातन् करावाच लागेल. भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा ही शेतीच आहे, तिलाच जर एवढी घरघर लागत असेल, तर ध्येय-धोरणे पुन्हा तपासावी लागतील की नाही. काही निर्णयांचा पुनर्रविचार करावा लागणे, यातून शासनकर्त्यांचे नेमकेपण दृष्टीस पडते. आणि यासाठी भारतीय शेतकरी दिल्लीच्या रस्त्यावर बसून होता, हक्कासाठी, न्यायासाठी संसदेकडे डोळे लावून बघत होता, अन् अशातही शासन प्रशासनाने दबा धरावा, आंदोलनजीवी म्हणून त्यांच्यापासून सावध रहा म्हणावे, आंदोलन फुटीचे विविध प्रयत्न करावेत, आणि सत्तेचा, पदाचा यासाठी वेगवेगळ्या प्रकारे वापर करावा, असा कावा करणे हे बरे नव्हे. जे काही आहे ते जाहिरपणे व रोखठोक मांडावे, चांगले आहे तर त्याचे स्पष्टीकरण द्यावे, त्या चांगल्याचा प्रचार करावा, चर्चा जरूर करावी पण उत्तरात, अश्वासनात प्रश्नांची सोडवणूक असली पाहिजे, नसता ह्या साऱ्यात नुसती अडवणूक होत असेल तर, आपली सारीच्या सारी धोरणं नेमकेपणाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कृषीविषयक दृष्टिकोणातून तपासली पाहिजेत की नाही. हा ही विचार करावाच लागेल.

काहीतरी मिळाले पाहिजे, मिळवले पाहिजे त्यासाठी कर्मठता, यज्ञ-याग आदिंचे जे प्रस्थ बोकाळले आहे, त्यामुळे आपल्याकडून मिळवायचे प्रयत्नच होतांना दिसत नाहीत. हे पुन्हा पुन्हा तपासायची वेळ येते, म्हणून तर छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक जोखमा पत्करून अनेक मोहिमा यशस्वी केल्या, आणि रयतेचे स्वराज्य उभे राहिले, विस्तारले. त्यापाठीमागे भक्कम प्रयत्नवाद होता हे विसरून कसे चालेल. मनगटाच्या जोरावर आणि सर्वांची सोबतही त्यात महत्वाची होती. या गोष्टींचा वाढत्या एककल्ली वृत्तीला, स्वार्थी वृत्तीला विसर पडत चालला आहे. निर्णय स्वातंत्र्य, सन्मान आणि स्त्री-विषयक दृष्टिकोनातून परंपरेने, व्यवस्थेने नाकारलेला दर्जाही छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्यामुळे स्त्रीयांना मिळाला होता. तोही हरवल्याचे चित्र सध्या सर्वत्र आहे की नाही.? हिंगणघाटची फुलराणी व या आणि अशा वाढत जाणाऱ्या महिलांच्या व्यथा हे आजच्या एकूणच व्यवस्थेला पडलेले भले मोठे प्रश्नचिन्ह आहे. स्त्री शिकली, पुढारली पण शिवशाहीतल्या सारखी सुरक्षित मात्र नाही. ही खेदाची बाब म्हणावी लागेल. अशीच छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळाला दिलेल्या ध्येय-धोरणाची जोड महत्वपुर्ण होती. म्हणूनच स्वराज्याच्या लोककल्याणकारी धोराणांची आजही अमलबजावणी होणे गरजेचे वाटते. शिवशाहीचे जलव्यावस्थापन म्हणजे दुष्काळ आणि तत्सम समस्यांचे 'pication is better than queir' असायचे. कृषीधोरण असे की, एकाही शेतकऱ्याची आत्महत्या तर नाहीच पण त्यांच्या जगण्याचा सन्मान करणारे, लोकोपयोगी कायदे आणि त्याची परीणामी अमलबजावणी, माणसाची पारख गुणात्मक असायची, त्यामुळे जातीच्या कळपापेक्षा मावळ्यांत एकता नांदायची, 'मस्जीद इथे अन् मंदिर तिथे' अशी आपलेपणाची भावना सदैव नांदायची, म्हणून तर सर्वधर्मसमभाव या तत्वावर त्यागाची भगवी पताका फडकायची. आणि स्त्री कोणत्याही धर्माची, जातीची असो ती आईच वाटायची. दगाबाजी तर शब्दात नव्हती ती वागण्यात कशी येणार, अशी निस्सीम निष्ठा प्रत्येकाची स्वराज्यावर होती. म्हणून तर जनाधार असणारे राजेशाहीचे स्वराज्य हे एकमेव उदाहरण असावे, एवढेच नाही तर डच, पोर्तुगीज, इंग्रज, इ. परकीयांनाही छत्रपती शिवाजी महाराजांचा व त्यांच्या कार्यकुशलतेचा धाक असायचा. हेच शिवशाहीचे ध्येय-धोरण आपण सर्वांनी मिळून केवळ इतिहास जमा केलं आहे. राजकारण, समाजकारण, लोकहित याबाबतीत ठाणपणाची एक भूमिका घ्यावी लागते. आणि ती भूमिका आडून, पडद्यामागून नाही, किंवा दुसऱ्याच्या हाती देऊन भागणार नाही. जिचा आज सर्रास, सर्वकस आभाव दिसतो. विसंगत विचार आणि परस्पर निर्णय अशा दोन्ही पातळीवर आज सर्वत्र अलबेल वातावरण असताना, विश्वास कोणाचा व कसली न्यायाची अपेक्षा ठेवावी. तेव्हा मानवता, मानवीमूल्य आणि लोककल्याणासाठी काही करायचे असेल तर, अगोदर आपल्याला शिवशाही धोरणात रूजवावी लागेल.

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
शिवाजीनगर, गढी